दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२५५ | सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### नायलॉन मांजाची दहशत

संक्रांतीला काही दिवस बाकी असताना नायलॉन मांजाने मात्र माणसे आणि पक्ष्यांभोवती फास आवळायला सुरुवात केली आहे. आनंदासाठी खेळला जाणारा पतंगबाजीचा खेळ नायलॉन मांजाच्या वापरामुळे धोकादायक बनत चालला आहे. मांजाने गळा चिरल्याच्या आणि जीव धोक्यात आल्याच्या घटना वाढत आहेत. संक्रांतीच्या पूर्वकाळात या मांजामुळे अपघात घडतात. त्यात लोकांच्या जीवाशी खेळ घडतो.

# ई पीक पाहणी करा अन्यथा मदत मिळणार नाही

पुणे । प्रतिनिधी


**रब्बी हंगामातील ई–पीक पाहणीसाठी दिलेली अंतिम मुदत जवळ येत असून अजूनही मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली नाही. ७/१२ उताऱ्यावर पीक नोंद न झाल्यास पीकविमा, नुकसानभरपाई तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.**

शासनाच्या रब्बी हंगामासाठीच्या महत्त्वाकांक्षी ई–पीक पाहणी (डिजिटल क्रॉप सर्व्हे) उपक्रमाची अंमलबजावणी सुरू असली, तरी राज्यात प्रत्यक्ष नोंदणीचा वेग अपेक्षेइतका नसल्याचे चित्र आहे. १० डिसेंबर २०२५ पासून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांनी स्वतःच्या ७/१२ उताऱ्यावर पिकांची नोंद अँड्रॉइड मोबाईलद्वारे करणे बंधनकारक आहे. मात्र, २४ जानेवारी ही अंतिम मुदत जवळ येऊनही मोठ्या प्रमाणावर क्षेत्र अजून नोंदणीबाहेर असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. आकडेवारी पाहता डिजिटल उपक्रम




आणि शेतकरी सहभाग यामध्ये अजूनही मोठी दरी असल्याचे स्पष्ट होत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने शेतकऱ्यांनी ई–पीक पाहणीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले आहे. अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोनचा अभाव, इंटरनेट समस्या किंवा ॲप हाताळण्यातील अडचणी दिसून येत आहेत. अशा परिस्थितीत तलाठी, कोतवाल, कॉमन सर्व्हिस सेंटर, तसेच गावनिहाय नियुक्त सहाय्यकांची मदत घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ई–पीक पाहणी ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून, ती शेतकऱ्यांच्या भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेशी थेट जोडलेली आहे. जर ७/१२ उताऱ्यावर पीक नोंद झाली नाही, तर संबंधित पीकपेरा कोरा राहतो आणि तो नंतर भरता येत नाही. परिणामी, पीकविमा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई, विविध शासकीय अनुदाने व योजना यांचा लाभ मिळण्यात मोठे अडथळे येऊ शकतात. अवकाळी पाऊस, गारपीट किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अचूक पीक नोंद हीच शेतकऱ्यांची सर्वात मोठी ढाल ठरते. ७/१२ उताऱ्यावर अधिकृत पीक नोंद सुनिश्चित होते. पीकविमा व नुकसानभरपाईसाठी आधार मिळतो. कृषी योजनांचा लाभ सुलभ होतो. नैसर्गिक आपत्तीवेळी मदतीची प्रक्रिया जलद होते. यामुळे शेतकऱ्यांनी याकडे दुर्लक्ष न करता तात्काळ ई–पीक पाहणी करून घेण्याची गरजेचे आहे.




## थोडक्यात...

### अजितदादांचा एकेरी उल्लेख लांडगेंना शोभत नाही

पिंपरी: पिंपरी–चिंचवड महापालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार विरुद्ध भाजप आमदार महेश लांडगे यांच्यात सुप्त संघर्ष पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी पिंपरी–चिंचवड येथे आयोजित एका सभेला संबोधित करताना आमदार महेश लांडगेंवर टीका केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देताना महेश लांडगे यांनी एकेरी भाषेत अजित पवार यांचा उल्लेख केला होता. यानंतर आता राजकारण तापले असून, या टीकेला राष्ट्रवादीच्या फायर ब्रँड नेत्या तसेच पुणे महापालिकेच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार रुपाली पाटील–ठोंबरे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. एकेरी उल्लेख करणे आमदार महेश लांडगे यांना शोभत नाही. ज्यावेळी हे नगरसेवक होते तेव्हा राजकारणाची अ, आ, ई बाराखडी ते अजितदादांच्या बोटाला धरून शिकलेले आहेत. त्यामुळे तुम्ही ज्या भाषेत अजितदादांवर बोलला आहात हे अत्यंत चुकीचे असल्याचे रुपाली पाटील–ठोंबरे म्हणाल्या आहेत. तसेच महेश लांडगेंचे पिंपरी–चिंचवडकरांच्या लोकांसाठी योगदान काय? असा सवाल त्यांनी केला आहे.

### दहावी–बारावी परीक्षांसाठी दक्षता समिती नियुक्त

मुंबई: दहावी आणि बारावीच्या परीक्षा निकोप, गुणवत्तापूर्ण वातावरणात होण्यासाठी आता राज्यस्तरीय दक्षता समिती नियुक्त केली आहे. या परीक्षांवेळी कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबवण्याबरोबरच तणावमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्याची जबाबदारी राज्यस्तरीय दक्षता समितीवर सोपवण्यात आली असून, परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्हीचे नियंत्रण जिल्हा प्रशासनाकडे असेल. शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासननिर्णय प्रसिद्ध केला. प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन केली आहे. दक्षता समितीच्या सदस्यांनी परीक्षा कालावधीत केंद्रांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक आहे. विभागीय परीक्षा मंडळांनी उपद्रवी आणि संवेदनशील केंद्र ठरविलेल्या परीक्षा केंद्रांवर प्रभावी यंत्रणेची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे.

### इराणमध्ये सरकारविरोधी आंदोलन तीव्र आंदोलन

तेहरान : इराणमधील सरकारविरोधी आंदोलन दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालले असून २८ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या आंदोलनांनी आता संपूर्ण देश व्यापला आहे. आतापर्यंत किमान ३०० जणांचा मृत्यू झाला आहे, तर ३,६०० हून अधिक नागरिकांना अटक करण्यात आली आहे. आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या हिंसक चकमकींमुळे परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली आहे. राजधानी तेहरानमध्ये सुरू झालेले आंदोलन आता देशातील अनेक प्रांतांमध्ये पसरले आहे. आंदोलक रस्त्यावर उतरून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आहेत. अनेक ठिकाणी जाळपोळ, सरकारी मालमत्तेचे नुकसान आणि हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे चित्र आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आंदोलकांना कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

### अमेरिकेतील गुंतवणूक २१ टक्क्यांनी घटविली

दिल्ली: ब्लूमबर्गच्या आकडेवारीनुसार ३१ ऑक्टोबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भारताने अमेरिकन ट्रेझरी बाँडमधील आपली गुंतवणूक तब्बल २१ टक्क्यांनी कमी केली आहे. ही गुंतवणूक २४१.४ अब्ज डॉलरने कमी होऊन १९०.७ अब्ज डॉलर एवढीच राहिली आहे. गेल्या चार वर्षातील ही पहिलीच घटना आहे, ज्यामध्ये भारताने अमेरिकन ट्रेझरी बाँडमधील आपली गुंतवणूक कमी केली आहे. त्यापूर्वी मात्र ही गुंतवणूक वाढतच चालली होती, मात्र आता टॅरिफनंतर ही गुंतवणूक झपाट्याने कमी होत आहे. गुंतवणूक तज्ज्ञांच्या मते भारताने घेतलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे, भारत ज्या पद्धतीने ही गुंतवणूक कमी करत आहे आणि इतर गुंतवणुकीचे मार्ग शोधण्यात येत आहेत, यावरून हे दिसून येत आहे की, भारताचे डॉलरवर असलेले अवलंबित्व कमी होत आहे.


# राज्यातील जि.प.–पं.स. चे भविष्य आज ठरणार!

## राज्य निवडणुक आयोगाकडून मुदतवाढीची मागणी; आज सुनावणी

नवी दिल्ली। प्रतिनिधी


**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एक मोठी घडामोड समोर आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करून १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व निवडणुका प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. दरम्यान प्रशासकीय आणि




तांत्रिक कारणास्तव ही मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून मिळावी, अशी विनंती आयोगाने केली आहे. या अर्जावर सोमवारी (दि.१२ जानेवारी) तातडीने सुनावणी होण्याची शक्यता असून, न्यायालय मुदतवाढ देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, वसई–विरार महानगरपालिका निवडणुकीबाबतही सर्वोच्च न्यायालयात एक महत्त्वाची याचिका दाखल करण्यात आली आहे. या निवडणुकीला तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्रात काही गावांचा समावेश आयत्या वेळी करण्यात आल्याने कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली आहे, मात्र अद्याप अंतिम निकाल ▶▶ पान २ वर

## ‘लाडकी’च्या हप्त्याबाबत काँग्रेसचे निवडणूक आयोगाला पत्र



मुंबई । प्रतिनिधी

**लाडक्या बहिणींच्या हप्त्याबाबत काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आहे. महानगरपालिका निवडणूक संपल्यानंतर लाडकी बहीण योजनेची रक्कम महिलांना देण्यात यावी, अशी मागणीच काँग्रेसने या पत्रातून केली आहे.**

महाराष्ट्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ या योजनेचा हप्ता नेहमीच वादाच्या भोवऱ्यात राहिला आहे. लाडक्या बहिणींचा डिसेंबरचा हप्ता अद्यापही त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. त्यामुळे डिसेंबर महिन्याचा हप्ता आणि जानेवारी महिन्याचा हप्ता असा एकत्रितपणे ३ हजार रुपयांचा हप्ता १४ किंवा १५ जानेवारी रोजी जमा होण्याची शक्यता होती. परंतु, हे दोन्ही महिन्यांचे हप्ते लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होण्याआधीच याबाबत ▶▶ पान २ वर

## नेकनूर आठवडी बाजारातून १५ किलो चांदी चोरट्यांनी लांबवली



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नेकनूर येथील आठवडी बाजारामध्ये आणि पोलीस ठाण्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या बाजारात रविवारी मोठ्या चोरीची धक्कादायक घटना घडली असून, चोरट्यांनी तब्बल सुमारे १५ किलो चांदी लंपास केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी आठवडी बाजार असल्याने नेकनूर येथील सोने व्यापारी बबन पांडुरंग कानडे यांनी नेहमीप्रमाणे बाजारात पाल ठोकून दुकान मांडले होते. त्यांचा नेकनूरमध्ये कायमस्वरूपी ▶▶ पान २ वर

## कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात कपात

### शेकडो कंत्राटी कर्मचारी संतप्त, आंदोलनाचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२५ च्या मानधनातून कंत्राटदार कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता परस्पर २५ टक्के कपात केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या अन्यायकारक कपातीमुळे शेकडो कंत्राटी कर्मचारी संतप्त



झाले असून कपात केलेली रक्कम तातडीने अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

राज्यातील जिल्हा परिषद कार्यालयांतर्गत राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी शेकडो कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. ऑक्टोबर महिन्याचे मानधन नोव्हेंबरमध्ये, ▶▶ पान २ वर

## गोळीबार आणि खून प्रकरणातील आरोपी पकडला

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अंकुश नगर परिसरात प्लंबिंग काम करणाऱ्या एका मजुरावर दिवसाढवळ्या गोळीबार करून व धारदार शस्त्राने तोंडावर वार करत निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला सहा दिवस झाले मात्र आज एलसीबीच्या टीमने त्याचा मागवा काढून त्याला ताब्यात घेतले. हर्षद तुळशीराम शिंदे या तरुणावर बंदुकीतून गोळ्या झाडत व नंतर धारदार शस्त्राने वार करून ▶▶ पान २ वर

## राज्यात खळबळ..! उमेदवारांकडून पैशांच्या पाकिटाचे वाटप

### भाजपा उमेदवाराचे कृत्य, निवडणूक आयोग घटनास्थळी

ठाणे । प्रतिनिधी

महापालिका निवडणुकीतील प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून बूथवरही कार्यकर्ते आणि पदाधिकारी नियोजनबद्ध काम करताना दिसून येतात. मात्र, काही ठिकाणी मतदारांना आमिष आणि पैसे देण्याचे प्रकारही उघडकीस येत आहेत. भाजपने सर्वाधिक जागा बिनविरोध केलेल्या कल्याण डोंबिवली महापालिकेतील ▶▶ पान २ वर



## नथुराम गोडसे माणसात नव्हता–ओवेसींची टीका

जालना । प्रतिनिधी



महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील राजकीय वातावरण तापलेले असतानाच, एमआयएम अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी जालन्यातील सभेत नथुराम गोडसेचा उल्लेख करत अत्यंत वादग्रस्त विधान केले आहे. नथुराम गोडसे माणसात नव्हता, तशीच सवय तुम्हाला लागली आहे, अशा शब्दांत ओवेसींनी विरोधकांवर ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०१.०० क्विंटल | २,४०० | २,७५३ | २,५७१ |
| ज्वारी/हायब्रिड :६५.५० क्विंटल | २,३९० | ३,४७५ | २,८४१ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १८३.०० क्विंटल | ३,८१० | ६,९०० | ६,३८४ |
| उडीद :२२.०० क्विंटल | ४,२०१ | ६,९०० | ५,८१२ |
| बाजरी: २३.०० क्विंटल | २,५०० | ३,१०० | २,७९६ |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,७५० | ६,९१० | ५,८३० |

# तणाव, प्रदूषणामुळे पुरुषांमधील थायरॉईड ग्रंथींवर परिणाम

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**थायरॉईड ही केवळ महिलांची समस्या समजली जात होती. मात्र, बदलती जीवनशैली, सततचा तणाव, प्रदुषण, आहाराच्या अनियमित वेळा आणि वाढते प्रदूषण यामुळे आता पुरुषांमध्येही थायरॉईड विकारांचे प्रमाण वाढले आहे.**

थायरॉईडच्या समस्या या सर्वच वयोगटातील पुरुष आणि महिलांना प्रभावित करू शकतात. वाढता ताण, चुकीची जीवनशैली आणि प्रदूषण यांसारखी विविध कारणे विशेषत: शहरी भागात थायरॉईडच्या



समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. खाण्या–पिण्याच्या चुकीच्या सवयी, जेवण वगळणे, अनियमित वेळा, मध्यरात्री खाणे, प्रक्रिया केलेल्या अन्नावर अवलंबून राहणे आणि जास्त ▶▶ पान २ वर

### पुरुषांमधील थायरॉईड विकाराची लक्षणे

महिलांप्रमाणेच, पुरुषही थायरॉईडच्या समस्यांचा सामना करतात. तथापि, पुरुषांमधील थायरॉईडच्या समस्यांची नोंद होत नाही कारण त्यांची लक्षणे इतर आजारांच्या लक्षणांसारखीच असतात. या धोक्याच्या लक्षणांकडे अनेकदा ताण किंवा वाढते वय म्हणून दुर्लक्ष केले जाते. पुरुषांनी अचानक वजन वाढणे किंवा कमी होणे, सतत थकवा, कमी झालेला स्टॅमिना, नैराश्य, केस पातळ होणे, स्नायूंचा अशक्तपणा आणि लैंगिक आरोग्याच्या समस्या यांसारख्या लक्षणांकडे लक्ष दिले पाहिजे. वाढता ताणतणाव, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव, धूम्रपान, मद्यपान आणि कौटुंबिक इतिहास ही याची प्रमुख कारणे आहे.

## अग्रलेख

# नायलॉन मांजाची दहशत

संक्रांतीला काही दिवस बाकी असताना नायलॉन मांजाने मात्र माणसे आणि पक्ष्यांभोवती फास आवळायला सुरुवात केली आहे. आनंदासाठी खेळला जाणारा पतंगबाजीचा खेळ नायलॉन मांजाच्या वापरामुळे धोकादायक बनत चालला आहे. मांजाने गळा चिरल्याच्या आणि जीव धोक्यात आल्याच्या घटना वाढत आहेत. संक्रांतीच्या पूर्वकाळात या मांजामुळे अपघात घडतात. त्यात लोकांच्या जीवाशी खेळ घडतो. संक्रातीनंतर मांजाचा फास बसून जखमी झालेले पक्षी सापडतात तर काहींचे जीव गेल्याने ते झाडाला लटकलेल्या अवस्थेत दिसतात. नायलॉन मांजामुळे माणसांचे जीव जातात तरी कोणालाच फरक पडत नाही, तिथे पशुपक्ष्यांच्या जीवाचे मोल कोणी अपेक्षित करावे? निसर्गप्रेमी सोडले तर त्यांच्या मृत्यूकडे सामान्य माणसांचे लक्ष तरी जात असू शकेल का? त्यांना बोलता आले असते तर त्यांच्या वेदना त्यांनी सांगितल्या असत्या.

मुले त्यांच्याही कळत-नकळत वापरत असलेल्या घातक मांजामुळे प्रसंगी अपघात घडतात हे तरी किती पालकांना माहित असू शकेल? अलीकडच्या काळात नायलॉन मांजा विक्रेत्यांवर धाडी आणि अवैध मांजा जप्ती या सरकारी उपचाराची त्यात भर पडली आहे. वर्षानुवर्षे अशा धाडी पडतात. किती मांजा जप्त केला याचे आकडे जाहीर होतात. तरीही मांजा विक्री आणि म्हणूनच त्याचा वापर थांबलेला नाही. बहुधा सरकार आणि प्रशासनालाही तेच अपेक्षित असू शकेल का? कारण नायलॉन मांजा उत्पादन, विक्री आणि त्याचा वापर यावर राष्ट्रीय हरित लवादाने २०१७ सालीच बंदी घातली आहे. तरीही त्याची लपूनछपून विक्री सुरूच आहे. उत्पादन आणि विक्री ही साखळी असते. उत्पादन झाले की त्याच्या विक्रीचे प्रयत्न केले जाणारच, मग ते बेकायदा का असेना. बरे मांजाची संक्रांतीच्या काही दिवस अगोदर विक्री सुरु होते. त्यासाठी वर्षभर त्याच्या उत्पादनाची प्रक्रिया सुरु असणार. म्हणजे उत्पादन होऊ द्यायचे; पण त्याच्या विक्रींवर मात्र बंदी. अशीच अतार्किक कृती वाहनांच्या हॉर्नबाबत आणि एकदा वापरून फेकून दिल्या जाणाऱ्या प्लास्टिकबाबत आढळते. कर्कश्य हॉर्नवर बंदी असते. प्रशासन असे हॉर्न जप्त करते आणि एक दिवस त्यांची विल्हेवाट लावली जाते. हॉर्नवर बुलडोझर फिरवल्याची छायाचित्रेही अधूनमधून प्रसिद्ध होतात. पण ना हॉर्न वापरणे बंद झाले ना मांजा विक्री. कारण त्याचे उत्पादन ही मूळ समस्या आहे. मांजा असो वा हॉर्न, विक्रीला बंदी असेल तर उत्पादन कसे होते? का होऊ दिले जाते? त्यांची छुपी विक्री होणारच. म्हणजेच कारवाईचे वरातीमागून धावणारे घोडे प्रभावहीन ठरते. किंवा काहीतरी केल्याचा आभास निर्माण करणे हाच त्यामागचा उद्देश असावा का? याच मुद्यावर उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने पुढाकार घेतला होता. नायलॉन मांजाच्या वापराचे धोके हा मुद्दा अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे आदेश सरकारला दिले होते. त्या आदेशाचे पुढे काय झाले, याचे उत्तर सरकार किंवा प्रशासन देईल का? तात्पर्य, उत्पादनावर बंदी घातल्याशिवाय विक्री थांबणार नाही.

उत्पादन नाही म्हणजे विक्री नाही. मग धाडी टाकायची गरज राहणार नाही. कायमस्वरूपी धोरण आणि जागरूकता निर्माण करण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न या मार्गाने नायलॉन मांजाची दहशत कमी केली जाऊ शकेल. यात पालकांचा सहभाग ही प्रक्रिया अधिक प्रभावशाली ठरू शकेल. मुले पतंग कुठून आणतात? कोणता मांजा वापरतात? नायलॉन मांजा वापरत असतील तर त्यांनी तो कुठून आणला? त्यासाठी किती पैसे खर्च केले? अशा बाबींवर पालक लक्ष ठेवू शकतील. नायलॉन मांजा वापराचे धोके मुलांना समजवून सांगू शकतील. त्यांनी तो वापरूच नये असा दंडक घालू शकतील. प्रसंगी कडक भूमिका घेतली तर नायलॉन मांजा त्यांच्या घरात येणार नाही आणि मुलेही धोकामुक्त पतंगबाजीचा आनंद घेऊ शकतील. पतंगबाजीतील आनंद कायमस्वरूपी उपभोगायचा असेल तर सामूहिक कृती आवश्यक आहे. लोकसहभाग ऐच्छिक असू शकेल पण या समस्येवर कायमस्वरूपी उदाहरण शोधणे ही मात्र सरकारची जबाबदारी आहे.

# किशोरी इंग्लिश स्कूलच्या स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत झाला-नितिका विलास

## शिक्षणासोबत संस्कार, कला आणि सर्व विद्यार्थांना समान संधी देण्याची भूमिका किशोरी इंग्लिश स्कूल जोपासते- संचालिका डॉ.अदिती सारडा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथील प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट संचलित किशोरी इंग्लिश स्कूलच्या तिसऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा सांस्कृतिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहूण्या म्हणून उपस्थित असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील अतिरिक्त आयकर आयुक्त सौ. नितिका विलास मॅडम यांनी विद्यार्थांचे कौतूक केले. त्या म्हणाल्या, अशा स्नेहसंमेलनातून लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवणारे असे दर्जेदार कार्यक्रम विद्यार्थांसाठी महत्वाचे आहेत. किशोरी इंग्लिश स्कूलच्या सुयोग्य नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांबद्दल त्यांनी विशेष प्रशंसा व्यक्त केली. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा आदित्य एज्युकेशन ग्रुप व प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका डॉ. अदिती सारडा यांनी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी व न्याय देण्याची भूमिका किशोरी इंग्लिश स्कूल सातत्याने जपत असल्याचे स्पष्ट केले.**

शहरातील नामांकीत प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट संचलित किशोरी इंग्लिश स्कूल शाळेचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडले. शाळेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या




कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून, शिस्तबद्ध नियोजन व दर्जेदार सादरीकरणामुळे उपस्थित मान्यवर व पालक प्रभावित झाले. प्लेग्रुप ते इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरणातून करत स्वत:चा आत्मविश्वास वाढला या स्नेहसंमेलनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील अतिरिक्त आयकर आयुक्त सौ. नितिका विलास या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य एज्युकेशन ग्रुप व प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका डॉ. अदिती सारडा या होत्या. यावेळी नामांकित चार्टर्ड अकाउंटंट गिरीषजी गिल्डा, प्रशासकीय अधिकारी संतोष लहाणे, राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या डी. ओ. तायडे आणि किशोरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या एम. आर. बिरला यांची उपस्थिती होती. या स्नेहसंमेलनात प्लेग्रुप ते इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाट्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भारूड, छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर आधारित सादरीकरण, तसेच महाभारतातील प्रसंगांच्या आधारे स्त्री अन्याय व स्त्री सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश देणाऱ्या नाट्यप्रयोगाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. लहानग्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला पालक व मान्यवरांकडून भरभरून दाद मिळाली. मान्यवरांनी आपल्या भाषणांतून किशोरी इंग्लिश स्कूलच्या शिक्षण पद्धतीचे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. शाळेतील शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे हे स्नेहसंमेलन यशस्वी ठरले असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार आणि कला जोपासणारी शाळा म्हणून किशोरी इंग्लिश स्कूलने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# शहराला स्मार्ट सिटी बनविण्यासाठी महापालिकेत भाजपची एक हाती सत्ता द्यावी-माजी मंत्री रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहराला स्मार्ट सिटी बनविण्यासाठी भाजपची एक हाती सत्ता जालना महापालिका निवडणुकीत देऊन भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी जालना येथील भाजपा उमेदवाराच्या प्रभाग क्र.१३ व प्रभाग क्रमांक १६ मधील उमेदवाराच्या प्रचारार्थ केली जालना शहरातील प्रभाग क्र.१३ व १६ मधील उमेदवाराच्या प्रचारार्थ माजी राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी मतदारांशी संवाद साधताना केले.**



ते म्हणाले की केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आहे, त्यामुळे महापालिकेत केंद्र व राज्य शासनाकडून विकास कामासाठी निधी आणण्यासाठी जालना महापालिकेत भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे. मतदारांची संवाद साधताना दानवे म्हणाले मी २०१४ पासून केंद्रात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी असताना व राज्यात देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना मी केंद्रात राज्यमंत्री व भाजपचा प्रदेशाध्यक्ष असताना जालना शहरासाठी रेल्वे स्थानकाला नवीन इमारतीसाठी २०० कोटी रुपये मंजूर केले व ते काम प्रगतीपथावर आहे, जालना येथून मुंबईसाठी नवीन वंदे भारत रेल्वे सुरु केली, शंभर कोटीचे रेल्वे पिट लाईन, सरस्वती कॉलनी व सहकार बँक कॉलनीकडे जाणाऱ्या रेल्वे भुयारी मार्गास दोन कोटी काम पूर्ण झाले, देशातील तिसरे आयसिटी कॉलेज जालना येथे आणले, शासकीय व वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून काम प्रगतीपथावर आहे, जायकवाडी जालना पाणीपुरवठा योजनेसाठी २०० कोटी, जालना शहरातील अंतर्गत पाणीपुरवठासाठी पाईपलाईन व पाण्याची टाकी उभारण्यासाठी १३० कोटी, जालना जळगाव नवीन रेल्वे मार्गास सात हजार कोटी मंजूर करून भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे, जालना शहरासाठी सोलर प्रकल्प करिता शंभर कोटी, शहरातील निजाम कालीन लोखंडी पुलाच्या कामास १३.५ कोटी रुपये, शहरात सिमेंट काँक्रीट चौपदरीकरण १८ किलोमीटरचा वळण रस्ता, जालना शहरातील अंतर्गत रस्त्यासाठी दोनशे कोटी, ओपन जिम साठी सुमारे तीन कोटी, केंद्र शासनाच्या अमृत योजनेच्या अंतर्गत भूमिगत गटार योजनेसाठी ६५ कोटी, राजुर गणपती तीर्थक्षेत्रास तीस कोटीची विकास कामे केली, त्यामुळे भाजपचा महापौर होण्यासाठी जनतेने भाजपचे सर्व उमेदवारांना विजयी करावी व जालना शहराला स्मार्ट सिटी करण्यासाठी सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, यांच्यासह मतदाराची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# संजय मुथा यांच्या प्रचाराला खा.काळेंच्या रॅलीची ऊर्जा; प्रभागात परिवर्तनाचा सूर

## संजय मुथा हे जमिनीवर राहून; काम करणारे व्यक्तिमत्व-खा.काळे

**जालना । प्रतिनिधी**

**प्रभाग ६ चा विकास हा महाविकास आघाडीचा सामूहिक संकल्प आहे. जनतेच्या प्रश्नांवर थेट मैदानात उतरून उत्तर देणारे नेतृत्व आज इथे उभे आहे. संजय मुथा यांच्यासारखे जमिनीवर काम करणारे उमेदवार प्रभागाला नवी दिशा देतील आणि म्हणूनच परिवर्तनासाठी जनतेने एकजुटीने महाविकास आघाडीच्या पाठीशी उभे राहावे आणि प्रभागातील काँग्रेसचे सर्व उमेदवार विजयी करावे असे आवाहन खासदार डॉ. कल्याण काळे यांनी प्रचार रॅलीदरम्यान केले.**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ मध्ये महाविकास आघाडीने एकाच वेळी दोन आघाड्यांवर आक्रमक मोर्चेबांधणी केल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. एकीकडे काँग्रेसचे उमेदवार संजय मुथा व सहकारी उमेदवारांनी राबविलेला डोअर-टू-डोअर प्रचार, तर दुसरीकडे काल झालेली खासदार काळे यांची जंगी रॅली या दुहेरी रणनितीमुळे प्रभागात राजकीय समीकरणे झपाट्याने महाविकास आघाडीच्या बाजूने झुकताना दिसत आहेत. काँग्रेस आघाडीचे उमेदवार संजय मुथा, कमलाबाई भुरेवाल, इफत सलमान खान आणि नजीब अहमद मोहम्मद यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. रस्त्यांची दुरवस्था, सांडपाणी व्यवस्थेचा बिघाड, पावसाळ्यातील पुरस्थिती आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांचा पाढा



मतदारांनी उमेदवारांसमोर मांडला. विशेषतः भिस्तीपुरा परिसरात मागील पावसाळ्यात घरांमध्ये शिरलेल्या पाण्यामुळे झालेल्या नुकसानीने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष असल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर संजय मुथा यांनी केवळ आश्वासनांवर न थांबता, समस्यांचे कायमस्वरूपी समाधान करण्याचा ठोस निर्धार व्यक्त केला. "प्रभागाचा विकास हा कागदावर नव्हे, तर जमिनीवर दिसला पाहिजे," असा ठाम संदेश त्यांनी नागरिकांना दिला. दरम्यान, काल खासदार काळे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भव्य रॅलीने महाविकास आघाडीच्या प्रचाराला मोठे बळ दिले. रॅलीदरम्यान उसळलेली गर्दी, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि नागरिकांचा सहभाग पाहता प्रभागात राजकीय वातावरण पूर्णतः बदलल्याचे दिसून आले. या रॅलीमुळे संजय मुथा यांच्या प्रचाराला नवी ऊर्जा मिळाली असून, महाविकास आघाडी एकसंधपणे मैदानात उतरल्याचा स्पष्ट संदेश मतदारांपर्यंत पोहोचला. व्यापारी वर्गाशी संवाद साधताना संजय मुथा यांनी प्रभाग ६ च्या मध्यवर्ती व्यापारी स्वरूपावर भर देत, गुन्हेगारीमुक्त वातावरण आणि चोवीस तास सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या या भूमिकेला व्यापारी वर्गाकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. घरोघरी संवाद आणि खासदार काळेंच्या रॅलीमुळे निर्माण झालेल्या या संयुक्त प्रभावामुळे प्रभाग ६ मध्ये महाविकास आघाडीला स्पष्ट आघाडी मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली असून, विरोधकांच्या गोटात अस्वस्थता वाढल्याचे संकेत मिळत आहेत.

## पान १ वरून...

### 'लाडकी'च्या हप्त्याबाबत काँग्रेसचे

आक्षेप घेणारे पत्र काँग्रेसकडून निवडणूक आयोगाला पाठवण्यात आले आहे. ज्यानंतर निवडणूक आयोगाने सुद्धा काँग्रेसच्या या पत्राची गांभीर्याने दखल घेतली आहे. महापालिका निवडणुकीसाठी येत्या गुरुवारी म्हणजे १५ जानेवारीला मतदान होणार आहे, त्यामुळे निवडणुकीनंतर लाडक्या बहिणींना हप्ता देण्यात यावा, अशा आशयाचे पत्र काँग्रेसने निवडणूक आयोगाला लिहिले आहे. पण काँग्रेसच्या या पत्रावर भाजपने संताप व्यक्त केला आहे. लाडक्या बहिणींच्या हप्त्याबाबत काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आहे. महानगरपालिका निवडणूक संपल्यानंतर लाडकी बहीण योजनेची रक्कम महिलांना देण्यात यावी, अशी मागणीच काँग्रेसने या पत्रातून केली आहे. सरकारने लाडकी बहीण योजनेचा नोव्हेंबरचा हप्ता हा डिसेंबरच्या अखेरीस महिलांच्या खात्यात जमा केला आहे. त्यामुळे आता महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाच्या आदल्या दिवशी डिसेंबर २०२५ व जानेवारी २०२६ असे दोन महिन्याचे ३००० रुपये एकत्रितपणे महिलांच्या खात्यात जमा करण्याचा सरकारचा घाट आहे. ही बाब १ कोटीहून अधिक महिला मतदारांना प्रभावित करेल व निवडणुकीच्या दिवशी मतदान सत्तारूढ पक्षाच्या उमेदवारांना करण्यास प्रवृत्त करणार आहे. ही एक प्रकारची लाचारी आहे. यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होत आहे. त्यामुळे या योजनेचे पैसे निवडणूक संपल्यानंतर द्यावे, असे निर्देश आयोगाने शासनास द्यावे, अशी विनंती असल्याचे पत्र काँग्रेसने निवडणूक आयोगाला दिले आहे. काँग्रेसने दिलेल्या या पत्राची आता राज्य निवडणूक आयोगाकडून दखल घेण्यात आली आहे. काँग्रेसच्या तक्रारीवर विचार करू, असे उत्तर आयोगाकडून देण्यात आले आहे. त्यामुळे आता निवडणूक आयोग नेमका काय निर्णय देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. ज्यामुळे आता लाडक्या बहिणींच्या हप्त्याला ब्रेक लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पण काँग्रेसने निवडणूक आयोगाला दिलेल्या या पत्रामुळे भाजपने संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींबद्दलचा द्वेष काँग्रेसमध्ये ठासून भरला आहे. तो वरचेवर उफाळून येतो. आमच्या माता- भगिनींच्या चेह-यावरचा आनंद काँग्रेसला व काँग्रेस नेत्यांना बघवत नाही. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली, त्यावेळी ही योजना बंद करा म्हणून काँग्रेस समर्थक कार्यकर्त्याने हायकोर्टात याचिका दाखल केली होती, असे मत भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले आहे.

--------------

### राज्यातील जि.प.-पं.स.

आलेला नाही. निकाल लागेपर्यंत निवडणूक प्रक्रियेला स्थगिती मिळावी, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी केली आहे. सोमवारी (दि.१२ जानेवारी) सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यासमोर या याचिकेवर तातडीची सुनावणी होणार आहे. या सुनावणीत न्यायालय काय दिशानिर्देश देते, यावर वसई-विरारच्या निवडणुकीचे भवितव्य अवलंबून असेल.

---------------

### कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या

तर नोव्हेंबरचे मानधन डिसेंबरमध्ये देण्यात आले. मात्र, दोन्ही महिन्यांच्या मानधनातून २५ टक्के रक्कम कपात करण्यात आली. याबाबत वारंवार विचारणा करूनही संबंधित कंत्राटदार कंपनीकडून समाधानकारक उत्तर देण्यात आलेले नाही. राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान कंत्राटी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विनोद आमले यांनी सांगितले की, वेतन देयक कायदा १९३६ नुसार कर्मचाऱ्याला वेळेवर आणि पूर्ण वेतन देणे नियोक्त्याचे बंधनकारक कर्तव्य आहे. कोणतीही वेतन कपात केवळ कायद्यात नमूद कारणांसाठीच आणि कर्मचाऱ्याच्या लेखी संमतीनंतरच करता येते. कंपनीची आर्थिक अडचण हे कारण कायद्यात ग्राह्य धरलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांशी कोणताही करार नसताना करण्यात आलेली ही २५ टक्के कपात पूर्णतः बेकायदेशीर असल्याचा आरोप त्यांनी केला. संघटनेने ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२५ च्या मानधनातील कपात केलेली रक्कम तातडीने अदा करण्याची मागणी केली असून, अन्यथा काम बंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

-------------

### नेकनूर आठवडी बाजारातून १५

सोन्याच्या दुकानासह आठवडी बाजारातही विक्रीचा व्यवसाय आहे. बाजारातील गजबजलेल्या वातावरणात दुकान लावण्याची तयारी सुरू असतानाच विक्रीसाठी आणलेली सुमारे १५ किलो चांदी चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. सदर चांदीची अंदाजे किंमत सुमारे ४० लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. नेकनूरच्या आठवडी बाजारातून यापूर्वीही मोबाईल, पर्स दुचाकी, तसेच इतर मौल्यवान वस्तू चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडत असताना, आता एवढ्या मोठ्या प्रमाणात चोरी होणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. पोलीस ठाण्याच्या अगदी जवळ असलेल्या ठिकाणी ही घटना घडल्याने पोलिसांच्या गस्त व सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. सदर घटनेची तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित सोनार व्यापारी नेकनूर पोलीस ठाण्यात दाखल झाले असून, गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान या प्रकरणामुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आठवडी बाजारात तातडीने कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

----------------

### नथुराम गोडसे माणसात

हल्ला चढवला. त्यांच्या या विधानामुळे नवा राजकीय वाद उफाळून येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जालना महानगरपालिका निवडणुकीतील एमआयएम उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ओवेसी बोलत होते. यावेळी विरोधकांवर टीका करताना ते म्हणाले, काही जणांना आता माझे कपडे आवडू लागले आहेत. मात्र, एक लक्षात ठेवा, नथुराम गोडसे माणसात नव्हता, त्याला माणसं आवडायची. तशीच सवय आता या लोकांना (विरोधकांना) लागली आहे. ओवेसींच्या या विधानाचा रोख थेट सत्ताधारी आणि हिंदुत्ववादी संघटनांकडे असल्याचे मानले जात आहे. जर मी बोलण्यावर उतरलो, तर शब्द कमी पडतील, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. ओवेसींनी यावेळी बिहार निवडणुकीतील यशोगाथा सांगत जालन्यातील मतदारांना साद घातली. बिहारमध्ये मजलीसचे पाच उमेदवार जिंकले, कारण तिथल्या महिलांनी ९० टक्के मतदान केले. त्यामुळे पाचपैकी तीन आमदार निवडून आले. जालन्यातही एमआयएमच्या उमेदवाराला ९० टक्के मतदान झाले पाहिजे, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले. प्रत्येक मतदाराने घराबाहेर पडून मतदान करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# स्वच्छ व सुंदर जालना शहरासाठी मतदारांनी भाजपला साथ द्यावी-माजी मंत्री आ.लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहर स्वच्छ, सुंदर व विकसित बनवण्यासाठी तसेच प्रत्येक नागरिकाच्या घरापर्यंत दररोज नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी जालना शहरातील मतदारांनी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करून साथ द्यावी, असे आवाहन माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर यांनी केले.**

जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते नागरिकांशी संवाद साधतांना बोलत होते कि, मी पाणीपुरवठा मंत्री असताना संपूर्ण महाराष्ट्रात 'वॉटर ग्रीड ही महत्त्वाकांक्षी




पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. मात्र २०१९ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ही योजना बंद पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला. जालना शहराला विकासाच्या दिशेने पुढे नेण्यासाठी भाजपला एक संधी दिल्यास शहर स्वच्छ, सुंदर आणि मूलभूत सुविधांनी परिपूर्ण करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे मतदारांनी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करून विकासाला साथ द्यावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी आ. संतोष पाटील दानवे, माजी आमदार निवडणूक प्रमुख कैलासजी गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, भाजपा प्रदेश सचिव राहुलभैया लोणीकर, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, वसंतराव जगताप, बबनराव सिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

----------------

### राज्यात खळबळ..! उमेदवारांकडून

एका उमेदवाराच्या प्रचारार्थ चक्क पैशांचे वाटप केल्याचे उघडकीस आले आहे. डोंबिवलीतील एका महिलेच्या घरी पैशांची पाकिटे आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. निवडणूक प्रचारादरम्यान पांढऱ्या पाकिटात ३००० रुपये म्हणजे ५०० रुपयांच्या ६ नोटा टाकून हे पैसे वाटप केले जात असल्याचे निदर्शनास आले. डोंबिवलीच्या तुकाराम नगर परिसरातील दशरथ भुवन परिसरात भाजपकडून तीन हजार रुपयांची पाकीटे नागरिकांच्या घरी पोहोचवण्यात येत होती. येथील शिवसेनेचे उमेदवार नितीन पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी पैसे वाटणाऱ्याना रंगेहाथ हात पकडल्याने हे उघडकीस आले आहे. या घटनेनंतर निवडणूक आयोगाचे पथक व पोलीसही घटनास्थळी दाखल झाले. भाजपने सर्वाधिक जागा बिनविरोध केलेल्या महापालिकेतही भाजप उमेदवाराकडून पैशांचे अशाप्रकारे होत असलेले वाटप चर्चेत आहे.

------------

### तणाव, प्रदूषणामुळे पुरुषांमधील

प्रमाणात कॅफीनचे सेवन करणे यामुळे हार्मोनल असंतुलन होऊ शकते. थायरॉईड ग्रंथी या चयापचय प्रक्रिया, ऊर्जेची पातळी आणि वजन नियंत्रित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. जेव्हा जेवणाच्या वेळा अनियमित असताच आणि पुरक आहाराची कमतरता असते तेव्हा थायरॉईड ग्रंथी योग्यरित्या कार्य करत नाही. कामाचे वाढते तास, झोप न लागणे आणि सततचा ताण यामुळे हार्मोनल असंतुलन वाढते. ज्यामुळे थकवा येणे, वजन वाढणे अथवा कमी होणे, केस गळणे आणि मासिक आरोग्यातही बदल दिसून येतात. म्हणूनच थायरॉईड संतुलनावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. सध्या देशभरात वायू प्रदूषणाची समस्या वाढत आहे. त्यामुळे प्रदुषित हवा आणि हानिकारक रसायनांच्या संपर्कात येणे ही देखील थायरॉईड समस्यांची प्रमुख कारणं आहेत. जड धातू, कीटकनाशके आणि औद्योगिक रसायनांसारख्या प्रदूषकांमुळे हार्मोनल असंतुलनाची समस्या उद्भवू शकते. तज्ज्ञांनी केलेल्या अभ्यासांनुसार दीर्घकाळ प्रदूषित हवेच्या संपर्कात राहिल्याने थायरॉईड ग्रंथी कमी किंवा जास्त सक्रिय होण्याची शक्यता असते. शहर किंवा औद्योगिक भागात राहणाऱ्या लोकांना थायरॉईडच्या समस्यांचा धोका असू शकतो.

---------------

### गोळीबार आणि खून प्रकरणातील

जागीच ठार करण्यात आले होते. या घटनेचा सीसीटीव्ही व मोबाईल व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत होते.पोलिस अधीक्षकांनी हत्या झाल्यानंतर तत्काळ स्थानिक गुन्हे शाखा व शिवाजीनगरच्या टीम आरोपीच्या शोधासाठी रवाना केल्या होत्या. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. तब्बल पाच दिवसांच्या शोधानंतर रविवारी सायंकाळी ८.३० वाजता कळमकेज रोडवरून आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाडी, सुशांत सुतळे कर्मचार मनोज वाघ ,राहुल शिंदे,अर्जुन यादव,मनोज परजाने ,अश्फाक सय्यद,नितीन वडमारे, सिद्धेश्वर मांजरे तसेच स्थानिक गुन्हे शाखा व शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे केली.

-------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १२ जानेवारी २०२६



## थोडक्यात



### मोठेवाडीत ऊरूस यात्रा उत्सवात रंगला कुस्त्यांचा फड

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील औरंगशाह बाबा (पीर) यांच्या ऊरूस यात्रा उत्सवात शुक्रवारी कुस्त्यांचा फड रंगला होता. यामध्ये मराठवाड्यातील अनेक मल्लांनी आपला सहभाग नोंदवला होता.

शंभर रुपायांपासुन ५ हजार रूपायापर्यंत कुस्त्या लावण्यात आल्या. शेवटची ५ हजार ५५५ रूपायांची कुस्ती कायम सोबत मित्र मंडळ मोठेवाडी यांच्या वतीने लावण्यात आली. हि कुस्ती देव दहिफळ येथील लखन बडे याने जिंकली.कुस्त्यांचा चित्त थरारक क्षण पाहण्यासाठी परिसरातील कुस्ती प्रेमींनी गर्दी केली होती.हि कुस्ती दंगल यशस्वी करण्यासाठी समस्त ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



### धम्मध्वज दिनानिमित्त माजलगावात शांती-करुणेचा जागर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथे जागतिक बौद्ध धम्मध्वज दिनाच्या निमित्ताने एक प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या श्रद्धा व शांततामय वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम धम्म उपासक प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे सभासद दीपक भालेराव सर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर धम्मध्वजाचे पूजन करण्यात आले. धम्मध्वज हा शांती, करुणा, मैत्री, समता व प्रज्ञेचे प्रतीक असून तो मानवतेचा वैश्विक संदेश देतो, असे उपस्थितांना सांगण्यात आले. या कार्यक्रमास सदधम्म सेवा संघाचे सभासद तसेच बहुसंख्य उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात ॲड. दशरथ मकसरे, भगवानराव सातपुते, गौतम घनघाव, नवनाथ शिनगारे, रविकांत उघडे, प्रभाकर साळवे, सागर सातपुते, प्रशांत सातपुते, विक्रांत चांदमारे, भीमराव कांबळे, सिद्धार्थ ढवळे, नालंदाताई भालेराव व वंदनाताई शिनगारे हे प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी भिक्खू धम्मशील थेरो यांनी जागतिक धम्मध्वज दिनाचे महत्त्व विशद करणारे प्रभावी प्रवचन केले. आजच्या सामाजिक तणाव, द्वेष व असमानतेच्या पार्श्वभूमीवर भगवान बुद्धांचा धम्म हा शांती, नैतिकता व मानवतावादी जीवनमूल्यांचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. दान, शील व प्रज्ञेच्या आचरणातून व्यक्ती व समाजाचे सकारात्मक परिवर्तन शक्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमातून दानशीलता, समभाव व सामूहिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. उपस्थित उपासक-उपासिकांनी धम्म आचरणाचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता केली.संपूर्ण कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध व धम्ममय वातावरणात पार पडला. अशा उपक्रमांमुळे समाजात बंधुता, सद्भावना व नैतिक मूल्ये अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज सप्ताहाचे मंगळवार पासून आयोजन

## सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे -गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत वै सदगुरू किसान बाबा महाराज यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे ७५ वे अमृत महोत्सवी वर्ष असून ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे.



दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी दुपारी १२ वाजता ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजा करून, संत महंत व भाविक भक्तांच्या उपस्थितीत फुले टाकून धर्मनाथा बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात आरंभ होईल. अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दररोज काकडा आरती, विष्णू सहस्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण सोहळा गाथा भजन हरिपाठ प्रवचन सेवा,भावार्थरामायण संख्याकाळी ८:०० ते ११:०० हरी किर्तन, संगीत भजन, सार्वजनिक जागर असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे

हरी किर्तन सेवा

१३ जानेवारी मंगळवारी संजय नाना धोंडगे नाशिक १४ जानेवारी बुधवार कविराज झावरे अहिल्यानगर १५ जानेवारी गुरुवारी संतोष आढावणे बुलढाणा १६ जानेवारी शुक्रवारी योगीराज महाराज गोसावी पैठण १७ जानेवारी शनिवारी कृष्णा महाराज चौरे पंढरपूर १८ जानेवारी रविवारी श्रावण महाराज जगताप विसापूर १९ जानेवारी सोमवार चंद्रकांत महाराज खळेकर राहुरी

२० जानेवारी मंगळवार दुपारी ह भ प अक्रूर महाराज साखरे गेवराई यांचे १२ ते ०२ या वेळेत काल्याचे कीर्तन होईल, महा प्रसाद होईल २० संध्याकाळी ८:०० ते ११ वाजता ह भ प रामायणाचार्य पदमाकर महाराज देशमुख अमरावती यांचे कीर्तन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी महंत ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी केले आहे

किसान बाबानी सुरू केलेली भाकरीची परंपरा

गुरुवर्य सदगुरू वै. किसान बाबा महाराज यांच्या हस्ते ७५ वर्षा पूर्वी पासून गोरक्षनाथ टेकडी परिसरातील ८०ते ९० गावातील भाविक भक्तां भाकरीची पंगत नित्यनेमाने दररोज घेऊन येतात

व्यवस्था व नियोजन

- किर्तना करीता १ एककर भव्य डोम - २ एककर रिकाम्या जागेत अतिरिक्त बसण्याची सोय - ५ एककर मोठ्या गाड्यांची पार्किंग व २ एककर टू व्हिलर साठी व्यवस्था - पिंपळनेर पोलिस ठाणे ए. पी आय घुगे व कर्मचारी यांचा चोख बंदोबस्त

गर्भगिरी प्रदक्षिणा; नवनाथ बाबा यांची पालखी सोहळा

१४ जानेवारी बुधवार रोजी सकाळी साडेआठ वाजता गर्भगिरी प्रदक्षिणा महंत गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांची भव्य पालखी सोहळा निघणार आहे टाळ मृदुंग ढोल ताशा च्या गजरामध्ये भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी भाविक भक्तांनी उपस्थित राहावे'

## आत्मविश्वास आणि नेतृत्व गुण स्वयंशासन दिनामुळे वाढतो - प्राचार्य भोसले

वडवणी । प्रतिनिधी

शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत असताना किती अग्निदिव्यातून जावे लागते याची अनुभूती विद्यार्थ्यांना देण्यासाठी स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य वाय बी भोसले बोलताना म्हणाले की स्वयं शासन दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्व गुण विकसित होतात



सविस्तर वृत्त असे की वडवणी येथील डॉ. सोनाजीराव रांजवन विद्यालयात विद्यार्थी स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्राचार्या पासून ते सेवकापर्यंतच्या सर्व भूमिका अगदी तंतोतंतपणे योग्य पद्धतीने पार पाडल्या अनेक विद्यार्थी शिक्षकांची वर्गात शिकवत असताना धांदल उडाली त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये हास्याचा जल्लोष दिवसभराच्या कामकाजात दिसून आला तरी विद्यार्थी शिक्षकांमध्ये आपण शिक्षक झाल्याची भावना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या विद्यार्थी मुख्याध्यापिका प्रतिज्ञा कवचट, विद्यार्थी उपमुख्याध्यापिका समृद्धी मस्के, पर्यवेक्षक प्राची माने या विद्यार्थ्यांनी वडवणी तालुक्यातील २००० विद्यार्थी संख्या असलेली सगळ्यात मोठी शाळाचा कारभार योग्य पद्धतीने दिवसभरासाठी सांभाळला सदरील विद्यार्थ्यांना प्राचार्य वाय बी भोसले, पर्यवेक्षक जयदेव लांडे आणि इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक डी एस जाधवर, भागवत बुंदाटे, अर्जुन म्हेत्रे आधी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. स्वयंशासन दिन स्वयंशासन दिन म्हणजे विद्यार्थ्यांचा आनंदाचा दिवस विद्यार्थी शिक्षकाच्या भूमिकेत जाऊन तल्लीन होऊन शिकवत होते विद्यार्थी सुद्धा त्यांना योग्य पद्धतीने प्रतिसाद देत होते यावेळी बऱ्याचशा विद्यार्थी शिक्षकांनी आपले कौशल्यपणाला लावून चांगल्या पद्धतीने तास घेतले तर काहींची मात्र तारांबळ उडाली आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी सांगितले की विद्यार्थी होणे सोपे आहे परंतु शिक्षक होणे अवघड आहे ते आम्हाला शिक्षक झाल्यावरच कळाले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शाळेतील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

एवढ्या मोठ्या शाळेची एक दिवसाची विद्यार्थी मुख्याध्यापक बनण्याचं मला भाग्य लाभलं परंतु एका दिवसांनी जबाबदारी काय असते ते शिकवलं विद्यार्थी होणे सोपे आहे परंतु शिक्षक होणे अवघड आहे ते मला शिक्षक झाल्यावरच कळले

-प्रतिज्ञा कवचट,विद्यार्थी मुख्याध्यापिका

## चित्रकला स्पर्धेमध्ये उमटले थेटेगव्हाण आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांचे प्रतिबिंब...!

वडवणी । प्रतिनिधी






मुंबई गव्हर्मेंट ड्रायव्हिंग ग्रेड एक्झामिनेशन २०२५-२६ चित्रकला स्पर्धेचा काही महिन्यापूर्वीच झालेल्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला आहे. या स्पर्धेमध्ये शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण (कॅम्प कांदेवाडी) ता.धारूर जि. बीड या शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व शाळेतील कलाशिक्षक श्री संभाजी मुसळे सर यांच्या अथक परिश्रमातून, विद्यार्थ्यांची तयारी करून, त्यांच्याकडून चित्र कसे रेखायटायचे, रंग कसे भरायचे या सगळ्या गोष्टींचा सतत विद्यार्थ्यांकडून करून घेतलेला सराव,विद्यार्थ्यांनी घेतलेले कष्ट या सर्व परिश्रमाचे फलित निकालावरून स्पष्ट झाले.शासकीय माध्यमिक आश्रमशाळा थेटेगव्हाण चे तब्बल...! तीन विद्यार्थी ए ग्रेड ने व एक विद्यार्थी बी ग्रेड ने पास झाले आहेत.या वरून चित्रकला स्पर्धेमध्ये आदिवासी आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रतिबिंब उमटले आहे.हे विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशा मधून स्पष्ट होत आहे. यामध्ये वैष्णवी पांडुरंग चाफे ग्रेट-, श्यामबाला राणोजी वाकतकर ग्रेट-, दीपक गजानन नवले ग्रेट-, रोहिदास राणोजी वाकतकर ग्रेट- आणि आकाश शिवाजी पांडे ग्रेड- यासह निकाल शंभर टक्के लागला आहे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदिवासी विकास विभाग छत्रपती संभाजी नगर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे मॅडम तसेच प्रकल्पातील सर्व अधिकारी यांनी यशस्वी विद्यार्थी आणि सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा...! दिल्या आहेत. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर,माध्यमिक शिक्षक श्री.मारुती राठोड,श्री परमेश्वर तावसे,श्री नागनाथ भरडे,श्री.नागनाथ चात्रे,श्री गोरक्षनाथ अबुज,श्री शिवाजी गांधले,श्री संभाजी मुसळे,श्री व्ही.व्ही कुलकर्णी श्री हनुमान केंद्रे सर,श्रीमती शकुंतला गायकवाड मॅडम,श्रीमती सारिका डोंगरे मॅडम,श्रीमती.पुनम लांब मॅडम,भारती मुकाडे मॅडम,श्री अशोक मुंडे सर,श्री.बी.व्ही बडे,श्री राहुल करे,श्री शिवाजी घुले यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी या सर्वांनी पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना दिली आहेत.

## विनायक विद्यालय पेठ बीड एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा १०० % निकाल

बीड -कला संचालनालय मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल विनायक विद्यालयाचा शंभर टक्के लागला आहे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत कला संचालनालय मुंबई तर्फे .घेण्यात येणा-या शासकीय ग्रेड परीक्षा एलिमेंटरी व इंटरमिजिएट (चित्रकला) २०२५ च्या परीक्षेत आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित विनायक विद्यालय बीड येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विनायक विद्यालयातील एलिमेंटरी परीक्षेस ११विद्यार्थी होते इ ग्रेड मध्ये ०४ . उ ग्रेड मध्ये ०७ एकूण ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत एलिमेंटरी चा निकाल १००% तसेच उच्च स्तर परीक्षा इंटरमिजिएट परीक्षेमध्ये एकूण १२ विद्यार्थी होते - ग्रेड मध्ये१ विद्यार्थी उत्तीर्ण इ ग्रेड मध्ये ७ व उ ग्रेड मध्ये ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत वरील विद्यार्थ्यांना कला शिक्षक श्री विठ्ठल बहीर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे शाळेचे मुख्याध्यापक श्री रियाज बेग उप मुख्याध्यापक श्री माणिक अनुसे पर्यवेक्षक श्री सुहास आमरापूरकर , सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले

# वातावरणात बदल; सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढले

## बीड जिल्हा पुरवठा विभागात औषधांचा तुटवडा; याचा फटका ग्रामीण भागातील तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्राला

**तलवाडा । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून वातावरणात लक्षणीय बदल होत असून सकाळ-संध्याकाळ गारवा, दुपारी उष्णता आणि अचानक वाढलेली आर्द्रता यामुळे सर्दी-खोकला, घसा खवखवणे, ताप व अंगदुखीचे रुग्ण वाढताना दिसत आहेत. शासकीय व खासगी रुग्णालये, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये अशा तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे.**

तलवाडा प्रथामिक आरोग्य केंद्रात औषधांची माहिती समोर आली आहे.की यासंदर्भात तलवाडा प्रथमिक आरोग्य केंद्राची वैद्यकीय अधिकारी डॉ दहिफळे यांना दूरध्वनीवर विचारले असता त्यांनी सांगितले की प्राथमिक आरोग्य केंद्राची गाडी औषध पुरवठा करण्यासाठी गेली होती परंतु बीड जिल्ह्यातील औषध पुरवठा विभागात औषधाचा तुटवडा आहे. त्यामुळे खोकल्याचे सिरप नाही व दुसरे काही औषध पुरवठा कमी प्रमाणात मिळाला आहे .अशी माहिती डॉ दहिफळे यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली आहे.

तलवाड्यात रात्रीचे तापमान घटत असताना दुपारच्या वेळी कडक ऊन जाणवत आहे. या तापमानातील चढ-

उताराचा थेट परिणाम लहान मुले, वृद्ध नागरिक व आधीपासून आजार असलेल्या रुग्णांवर होत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञ सांगतात. अनेक रुग्णांना कोरडा खोकला, नाक वाहणे, डोकेदुखी,




### वरिष्ठ अधिकारी यांचे दुर्लक्ष

### रूग्णांच्या आरोग्याशी आरोग्य विभागानी खेळ मांडला

**खोकल्याचा औषध दोन महिन्यापासून पुरवठा विभागात नसल्यामुळे रुग्णांची हेळसांड, आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर साहेब बीड जिल्ह्याकडे लक्ष देतील का**

थकवा अशी लक्षणे दिसून येत असून काही ठिकाणी व्हायरल तापाचे रुणही आढळत आहेत. शहरासह ग्रामीण भागातील औषध दुकानांमध्ये सर्दी-खोकल्यावरील औषधांची मागणी वाढली आहे. विशेषतः शाळकरी मुले आणि कामानिमित्त घराबाहेर पडणारे नागरिक या आजाराला अधिक बळी पडत असल्याचे चित्र आहे. बदलत्या

हवामानामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होत असल्याने संसर्ग लवकर पसरतो, असे डॉक्टरांचे मत आहे. दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. थंड व उष्णतेतील अचानक बदल टाळावेत, सकाळ-संध्याकाळ गरम कपडे वापरावेत, पुरेसे पाणी प्यावे, घराबाहेर पडताना मास्कचा वापर करावा तसेच खोकताना-शिकताना स्वच्छतेची काळजी घ्यावी, असे सूचित करण्यात आले आहे. ताप किंवा खोकला वाढल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, स्वतःहून औषधे घेणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. हवामानात पुढील काही दिवसांतही चढ-उतार राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्यात औषधाचा तुटवड्याचा प्रश्न तात्काळ मार्गे लावण्यात यावा जेणेकरून ग्रामीण भागातील प्रथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा भासणार नाही याची महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर साहेब लक्ष देऊन तात्काळ प्रश्न सोडवावे आशी मागणी सर्व सामान्य नागरिकांतून होत आहे.

पान ६ वरुन...

### माजलगावात योगासन व

व राष्ट्र सेवा करू शकतो म्हणून सर्व समाजातील नागरिकांचे मन तन प्रसन्न व स्वस्थ निरोगी राहावे यासाठी हे संस्थान कायम प्रयत्नशील असते.शिबीरात विविध आजारावर कोणकोणती योगासने व प्राणायाम लाभदायक आहेत हे सांगितले जाईल, तसेच उच्च रक्तदाब,मधुमेह, सांधेदुखी, गुडघेदुखी इत्यादी आजारावर उपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान संयोजन समितीतर्फे अनंत रुद्रवार,गोविंद बजाज, लक्ष्मीकांत सोन्नर,जयप्रकाश मलवाडे,रवींद्र खोडवे,जगदीश साखरे,अजित भावठाणकर,प्रणील चिद्रवार,बबन सरवदे यांनी केले आहे.

### मंत्री पंकजाताई-आ.धस

लढवलेली असल्याने त्यांचा सर्वदूर संपर्क तर आहेच त्याचबरोबर स्थानिक निवडणूकांत पार जामखेड नगरपरिषदेत आपला माणूस निवडून आणण्याची ताकद त्यांच्याकडे होती.आजही धस यांची इमेज एक मराठा स्ट्राँगमॅन म्हणून जिल्ह्यात आहे.आणि ती तशी राहावी म्हणून सुरेश धस साम-दाम-दंड-भेद यांचा पुरेपूर वापर करतात.त्याचबरोबर राज्याचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्र भाजपचे सर्वेसर्वा देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत असलेला थेट संपर्क हिही धसांची जमेची बाजू आहे.सुरेश धस ऑप्टिक्समध्येही कमी पडत नाहीत.त्यांच्या घरातील संपर्क कार्यालयात आजही गोपीनाथ मुंडे साहेबांचा फोटो आहे ज्यांच्या हाताला धरून धस आमदार झालेले होते.तसेच ऊसतोड कामगारांच्या प्रश्नातही मध्यंतरी लक्ष घातल्याने आणि अधेमध्ये वेळोवेळी कामगारांना मदतीचा हात पुढे केल्याने धस बीडच्या ग्रामीण राजकारणात महत्वाचे ठरतात. दुसरीकडे पंकजा मुंडेंना परळी मतदारसंघात फारसा रस नाही.त्याला कारणही धनजंय मुंडेंची ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांवर असलेली मजबूत पकड हेही आहेच.परळी धनंजयला देऊन टाकली हे त्यांचं माळाकोळीतील वक्तव्यही त्याच अनुषंगाने विचारात घेता येईल.तसेच उद्या धनंजय मुंडेच भाजपमध्ये येतील याचीच जास्त शक्यता असल्याने आणि तशा बातम्या अन्? देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत धनंजय मुंडेंचा वाढता संपर्कही त्याला दुजोरा देत आहे.त्यामुळे जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या निवडणूकीत परळीत एकमेकांच्या सहमतीने दिलेले उमदेवार निवडून नगरपरिषद पॅटर्नच राबवला जाईल अशी दाट शक्यता आहे. त्यामुळे अगदी दोन महिन्यापूर्वी एकमेकांना गुर्मीत बोलणारे आणि दोन समाजांना एकमेकांच्या पुढे ऊभा करून कुरघोड्या करणारे नेतेमंडळी उद्या एकत्र बसून सभाही घेतील आणि सत्तेचा वाटाही मिळवतील यात दुमत नाही.

### अंशराशिकरण व उपदानाबाबत

अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली .मंत्रालय प्रशासन व आयुक्तालय तसेच शिक्षण संचनालय प्रशासनाने आमरण उपोषणाची व निवेदनाची गंभी गंभीर घेऊन तातडीने कार्यवाही सुरू केली असून जानेवारी महिन्याच्या बजेटमध्ये तरतूद करण्याची निःसंधीग्वाही दिली. जर जानेवारीच्या बजेट तरतुदीमध्ये अंश राशीकरण व उपदानासाठी वित्त तरतूद प्राप्त झाली नाही तर आमरण उपोषण अटळ असल्याचे महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्तशिक्षक समन्वय समितीकडून शासनास व प्रशासनात कळविण्यात आलेले आहे . या शिष्टमंडळामध्ये अनिल जाधवर,श्रीराम बहिर,राजेंद्र खेडकर, सुधाकर सावंत,हरिदास घोगरे,बाबुराव नागरगोजे हे सहभागी होते.

### फुलसांगवीतील सुवर्ण

जात आहे. असे श्री.संत वामनभाऊ महाराज यांचा जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे सुवर्ण महोत्सव सोहळा श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली शनिवार दि. ३ जानेवारी ते शनिवार दिनांक १० जानेवारी या काळामध्ये वैभवशाली थाटामध्ये पार पडला.

या सप्ताह सोहळ्यानिमित्त भाविक भक्तांना संबोधित करण्यासाठी आलेले सर्व संत -महंत, कीर्तनकार, कथाकार त्याचबरोबर सामाजिक, राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या जीवनकार्याचे पोवाडे गातांना भाऊ हे सर्व -धर्म समभावाची शिकवण देणारे संत होते. समाजकार्य बरोबरच विविध जाती-धर्मातील, तळागाळातील लोकांना एकत्रित करून संत विचाराचा प्रभाव टाकला आहे. म्हणूनच या ठिकाणी पंचक्रोशीतील समाज जातीभेद, सर्व धर्म समभावाने भाऊंची सेवा करत असताना दिसत आहे. आणि हीच शिकवण आपण घेतली पाहिजे यापुढेही मनामध्ये कसलाही जातीभेद, धर्मभेद न बाळगता भेदाभेद विसरून निरवैर आपले जीवन जगले पाहिजे. साधू संतांची आणि भाऊंची शिकवण आपण आत्मसात केली पाहिजे असे मत अनेकांनी या ठिकाणी व्यक्त केल्यामुळे सर्वधर्मसमभावाचे प्रभावी शिकवण या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात ऐकायला मिळाली आहे.

**सर्व जाती-धर्मातील भक्तांना पाहून मन भरून आले- महंत डॉ. नामदेव शास्त्री**

श्री.संत वामनभाऊ महाराज अवतारी पुरुष होते. आयुष्यभर समाज उद्धाराचे कार्य तर त्यांनी केलेच परंतु तळागाळातील सर्व जाती-धर्माला एकत्रित करून वारकरी संप्रदायाला आणि धर्म कार्याला त्यांनी मोठी बळकटी दिली होती. यामुळेच त्यांच्या अशा पुण्यतिथी सोहळ्याला सर्व जाती-धर्मातील लोक एकत्रित येतात मोठा आंदोत्सव साजरा करतात. फुलसांगवीकरांचा आदर्श कायम राहो असे म्हणत पुण्यतिथी सोहळा हा सर्व जाती धर्माला एकत्रित येऊन कार्य करण्याचा सोहळा आहे. हीच शिकवण तुम्ही आत्मसात करा आणि सर्व जाती धर्मातील सर्व लोक एकत्रित गुण्या गोविंदाने रहा असा मौलिक सल्ला श्री क्षेत्र भगवान गडाचे मठाधिपती महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांनी आपल्या कीर्तनातून उपस्थित भाविकांना दिला यामुळे परिसरातील जनतेला सर्वधर्मसमभावाची शिकवण मिळाली आहे.

### श्रीराम कथेमुळे मानवी

म्हणजे पहिल्या दिवशी या संत पूजनाचा मान आष्टी तालुक्यातील पत्रकारांना देण्यात आला त्यांचे वतीने ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे,ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज,ह.भ.प.दिनकर तांदळे महाराज,

ह.भ.प.रामदास डोरले नाना,ह.भ.प.नवनाथ महाराज पोकळे,ह.भ.प.हौसराव महाराज आजबे,ह.भ.प. कारंडे महाराज,ह.भ.प. बाळासाहेब महाराज झगडे,ह.भ.प. रवी महाराज तवले, ह.भ.प.नानासाहेब महाराज भोगाडे,ह.भ.प. शेंबडे महाराज पांढरी,ह.भ.प. शिवाजी महाराज कोकणे,ह.भ.प.गोविंद महाराज पवार,ह.भ.प. महेश महाराज बळे,ह.भ.प.जाधव महाराज दादेगावकर ह.भ.प. धस महाराज जामगावकर या संतांचे पूजन करण्यात आले.यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, पत्रकार दत्ताभाऊ काकडे, पत्रकार प्रवीण पोकळे, पत्रकार गणेश दळवी, पत्रकार सचिन रानडे, पत्रकार राजेंद्र लाड आदी उपस्थित होते.पंचायत समिती कार्यालयासमोर, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यानिमित्त आज भव्य शोभायात्रा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. या पावन सोहळ्याचे आयोजन संत चरण सेवक आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे.

छत्रपती कॉम्प्लेक्स येथून प्रारंभ झालेली ही शोभायात्रा लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनि चौक, कमानवेस, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पोलीस स्टेशन होत पंचायत समिती कार्यालयासमोर दाखल झाली. शोभायात्रेत भगवे ध्वज, टाळ-मृदुंगाच्या गजरात श्रीराम नामस्मरण, भजन-कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

cmyk

# दहा वर्षांत हळदीच्या वायदे बाजारात पचवीस हजार कोटींचा गैरव्यवहार!

## राजू शेट्टी घेणार केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट



पुणे। प्रतिनिधी


मागील आठ ते दहा वर्षांत देशातील हळदीच्या वायदे बाजारात अंदाजे पंचवीस हजार कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत त्याच्या सीबीआय चौकशीची मागणी राजू शेट्टी यांनी केंद्रीय अर्थमंत्री तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्याच अनुषंगाने पुढील आठवड्यात शेट्टी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत.

या वर्षी महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे हळदी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे हळदीचे देशांतर्गत उत्पादन अंदाजे २५ ते ३० टक्के कमी होण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. मागील वर्षाचा साठाही अत्यल्प आहे. तर दुसरीकडे हळद निर्यातीसाठी बाहेरील देशांतून मागणी वाढली आहे. अशा परिस्थितीत हळदीच्या वायदे बाजारातील काही मोजके व्यापारी दर पाडण्यासाठी तेजी-मंदीचा व्यवहार करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे हळदीचे उत्पादन कमी असतानासुद्धा शेतकऱ्यांना दरात त्याचा आर्थिक फायदा होणार नाही.

हळद गैरव्यवहाराची चौकशी करण्यासोबतच येणाऱ्या हंगामात हळदीचे दर टिकून राहावे आणि हळदीच्या वायदे बाजारात सट्टेबाजीचा खेळ खेळणाऱ्या काही मोजक्या लोकांवर कार्यवाही करावी, या मागण्यांच्या अनुषंगाने शेट्टी पुढील आठवड्यात शाह यांची भेट घेणार आहेत. या गैरप्रकारांमुळे हळद उत्पादक शेतकरी, व्यापारी तसेच या क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांमध्ये तीव्र चिंता निर्माण झाली आहे. याशिवाय, सहकार क्षेत्राशी निगडित काही महत्त्वाच्या प्रश्नांकडेही आपले लक्ष वेधण्याची माझी इच्छा आहे. या विषयांना धोरणात्मक पातळीवर मार्गदर्शनाची आवश्यकता असून, त्यांचा सहकारी संस्थांवर तसेच त्यांच्याशी संबंधित लाखो लोकांच्या उपजीविकेवर मोठा परिणाम होणार आहे. या विषयांचे गांभीर्य लक्षात घेता १२ जानेवारी किंवा १८ जानेवारी २०२६ रोजी भेटीची संधी देण्यात यावी, असे शेट्टी यांनी शाह यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे.

# धाराशिवमध्ये २१ कृषी केंद्रांवर कारवाई

## खत-बियाण्यांच्या काळ्या धंद्याला ब्रेक



धाराशिव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांची फसवणूक, खत-बियाण्यांची सक्तीची विक्री आणि नियमबाह्य व्यवहार करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर अखेर कृषी विभागाने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. धाराशिव जिल्ह्यात अवघ्या १५ दिवसांत राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत १८ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित, तर ३ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांची फसवणूक, खत-बियाण्यांची सक्तीची विक्री आणि नियमबाह्य व्यवहार करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर अखेर कृषी विभागाने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. धाराशिव जिल्ह्यात अवघ्या १५ दिवसांत राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत १८ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित, तर ३ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांची फसवणूक, अडवणूक आणि नियमबाह्य खतबी-बियाणे विक्रीला आळा घालण्यासाठी धाराशिव जिल्हा कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. गेल्या पंधरा दिवसांत राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत जिल्ह्यातील १८ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित, तर ३ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. या अचानक धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील नियम मोडणाऱ्या विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून, शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. धाराशिव जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणावर पेरणी होत असल्याने खत, बियाणे व कीटकनाशकांची मागणी वाढते. मात्र, या संधीचा गैरफायदा घेत काही कृषी सेवा केंद्रांकडून नियमांचे उल्लंघन करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट केली जात असल्याच्या तक्रारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे यांनी जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक प्रवीण पाटील यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपासणी पथकाची नेमणूक केली.

पथकाने गेल्या १५ दिवसांत जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील कृषी सेवा केंद्रांची अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. नियमानुसार प्रत्येक कृषी केंद्रासमोर उपलब्ध साठा व त्याचे दर दर्शवणारा भावफलक लावणे बंधनकारक असताना अनेक दुकानांमध्ये भावफलक गायब होते, तर काही ठिकाणी महत्त्वाच्या खतांची नोंदच करण्यात आलेली नव्हती. दोषी आढळलेल्या कृषी सेवा केंद्रांची सविस्तर सुनावणी घेण्यात आली. मात्र, काही केंद्रचालक समाधानकारक खुलासा करू शकले नाहीत. परिणामी १८ कृषी सेवा केंद्रांचे परवाने तात्पुरते निलंबित, तर गंभीर स्वरूपाच्या उल्लंघनांप्रकरणी ३ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले.

पुढील आठवड्यात ५० पेक्षा अधिक केंद्रांची सुनावणी

दरम्यान, ही मोहीम केवळ १५ दिवसांपुरती मर्यादित न ठेवता अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. येत्या आठवड्यात ५० पेक्षा अधिक कृषी सेवा केंद्रचालक व संबंधित कंपन्यांची सुनावणी होणार असून, समाधानकारक खुलासा न मिळाल्यास आणखी कठोर कारवाई केली जाणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.


# लिंबुवर्गीय फळपिकावरील डिंक्या रोगाचे व्यवस्थापन



डिंक्या हा रोग मोसंबी, संत्रा व कागदी लिंबावर येणारा प्रमूख बुरशीजन्य रोग असून त्यामूळे बऱ्याचशा बागांचा १० ते १२ वर्षामध्ये ऱ्हास होतो. हा रोग फायटोप्थोरा या बुरशीमूळे होत असून, या रोगाची बुरशी जमिनीमध्ये वर्षानुवर्ष सुप्त अवस्थेत वास्तव्य करुन राहत असते. या रोगाचा प्रादुर्भाव, प्रसार व वाढ होण्यासाठी जमिनीतील जास्तीचा ओलावा, दमट व उष्ण हवामान कारणीभूत ठरते. रोगग्रस्त खोड व फांद्यावर चिकट द्रवाचे स्त्रवण होत असते. म्हणून या रोगाला डिंक्या रोग असे म्हणतात. रोपवाटिकेत या रोगाचा प्रादूर्भाव झाल्यास रोपाची मुळे कुजतात त्यामूळे झाडाची वाढ खुंटूण पाने पिवळी पडून गळतात. रोगग्रस्त झाडावरील फांदया शेंडयाकडून खाली वाळतात. व कालांतराने रोगाची तिव्रता वाढल्यास संपूर्ण झाड वाळते. रोगाच्या वाढीमुळे जमिनीलगतचे खोड, सोटमूळ व तंतूमय मूळे कुजतात. त्यामूळे अन्न व पाणी शोषण करण्याची प्रक्रीया मंदावते.

व्यवस्थापन : बागेची लागवड करण्यासाठी रंगपूर लाईन या रोगप्रतीकारक खुंटाचा वापर करावा. चुनखडीचे प्रमाण जास्त असलेल्या, चिकन माती, दलदलीची जमिन इ. मध्ये फळ पिकाची लागवड करु नये. बागेला शक्यतो ठिबक सिंचनाने पाणी दयावे व अतिरीक्त पाण्याचा निचरा करण्याची सोय करावी. डिंक्या रोगाचा प्रादुर्भाव आढळून येताच मेटॅलॅक्झीकल २.५ ग्रॅम किंवा फोसाटाईल-ए एल २.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करुन फवारणी करावी. पावसाळयामध्ये गरजेनूसार या बुरशीनाशकांच्या आलटून पालटून १२ ते १५ दिवसाच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. प्रतीवर्षी पावसाळयापुर्वी व पावसाळयानंतर २ वेळा बोर्डोपेस्ट १ टक्का (१ किलो मोरचुद+१किलो कळीचा चुना +१० लि. पाणी) तयार करुन सर्व झाडाच्या खोडावर जमिनीपासून ३ ते ४ फुट उंची पर्यंत लावावेत. बोर्डोपेस्ट लावण्यापुर्वी रोगग्रस्त फांदया, खोडावरील तडकलेली साल व डिंक इ. काढून खोड स्वच्छ करावे. पावसाळयामध्ये १ टक्का बोर्डोमिश्रणाची (१ किलो मोरचुद+१किलो कळीचा चुना +१०० लि. पाणी) २ ते ३ वेळा फवारणी करावी. काही कारणास्तव झाडाची साल फाटली असल्यास १ टक्का पोटॅशिअम परमॅग्नेट १० ग्राम प्रति लिटर पाण्याने पुसून घ्यावी. त्या ठिकाणी बोर्डो पेस्ट लावावी.

# पिकांमध्ये स्फुरद अन्नद्रव्याची कमतरता आणि उपाय




स्फुरद (पी) फॉस्फरस/स्फुरद हे अन्नद्रव्य मातीमध्ये सहजासहजी विरघळत नाही. त्यामुळे किंवा त्याच्या गतीमध्ये स्थिर राहण्याचा गुणधर्म असल्यामुळे पिकामध्ये स्फुरदची कमतरता आढळून येते. याचा परिणाम पिकावर होत असतो. त्यामुळे त्याचे परिणाम समजून घेणेही महत्त्वाचे आहे.

पिकांवर होणार परिणाम : रोपांची वाढ खुंटते. रोपांची उंची कमी राहते. झाडे कमजोर होतात. वनस्पतीची जुनी पाने गडद हिरवी होतात. नंतर जांभळी, तांबूस, निळसर छटा दिसते. तसेच पानांच्या कडा वाळतात आणि पानांची संख्याही कमी होते. फुलधारणा उशिरा होते. तसेच फळे आणि शेंगा यांचा आकार लहान होतो. धान्यामध्ये आकार लहान होतो.

यावर असे करा उपाय : स्फुरदयुक्त खतांचा वापर करणे. यामध्ये सिंगल सुपर फॉस्फेट (एसएसपी), डाय अमोनियम फॉस्फेट (डीएपी) तसेच स्फुरदयुक्त खताबरोबर सेंद्रिय खतांचा वापर करणे. यामध्ये शेणखत, कंपोस्ट खत, गांडूळ खत, फॉस्फेट सोलीबल बॅक्टेरिया (पीएसबी) याचाही वापर स्फुरद उपलब्धतेसाठी करणे आवश्यक आहे. मायकोरायझा जिवाणूचा वापर केल्यास स्फुरदचे शोषण चांगल्या प्रकारे वनस्पतींना होते. मातीमधील सामू संतुलित ठेवणे गरजेचे आहे (७.०० ते ८.००) जमीन क्षारता मर्यादित ठेवणे (१.०० पेक्षा कमी) अशा रीतीने व्यवस्थापन केल्यास स्फुरदची उपलब्धता होऊन पिकाची वाढ जोमदार होते आणि उत्पादनातही वाढ होते.

# उन्हाळ्यातील चारा टंचाईवर उत्तम उपाय चारा बीट लागवड



दुष्काळी भागात आणि कमी पावसाच्या ठिकाणी गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होत असतो. कारण कमी पाऊस झाला तर जनावरांना उन्हाळ्यात काय खाऊ घालावे ही समस्या पशुपालकांसमोर निर्माण होत असते. कारण दुधाच्या उत्पादन कमी होत असते. या काळात हिरवा चारा पशुंना देणं जवळ-जवळ अशक्य असते. या काळात चारा बीट दुसऱ्या चार पिकांच्या तुलनेत कमी जागेत आणि कमी वेळात अधिक उत्पादित होते.

एक नवे चारा पीक विकसित करण्यात आले असून, अनेक राज्यातील शेतकऱ्यांना या पिकांविषयी माहिती दिली जात आहे. राजस्थानसह इतर राज्यातील क्षेत्रातही या पिकाचे उत्पादन चांगले आले आहे. दरम्यान चारा बीट आकार हा दुसऱ्या बीट सारखाचा दिसतो, पण याचा आकार मोठा असतो. याचे वजन हे पाच ते सहा किलो असते. ब्रिटेन, फ्रान्स, हॉलँड, न्युझीलँड या देशातील पशुपालकांमध्ये हे पीक खूप लोकप्रिय आहे. भारतातील पशुंसाठी चारा बीट किती उपयोगी आहे, यासाठी राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड आणि अनेक प्रदेशातील कृषी विभाग एकत्र येत काम सुरु केले आहे. चारा बीटाची लागवड ही नोव्हेंबरच्या दरम्यान केली जाते.

चार महिन्यात प्रति हेक्टर २०० टनापर्यंत याचे उत्पादन होते. खाऱ्या जमिनीत याचे उत्पादन चांगले येते. चारा बीटासाठी लागणारा खर्च हा एक रुपयांपेक्षा कमी असल्याचे कंवर यांनी माध्यमांना सांगितले आहे. चारा बीट हे दुसऱ्या चाऱ्यात मिसळून गुरांना खाऊ घातले पाहिजे. पिकांचे खोड हे छोटे-छोटे तुकडे करुन कोरड्या चाऱ्यात मिसळावे. गायी आणि म्हैशींसाठी प्रत्येक दिवशी १२ ते २० किलोचा खुराक द्यावा. तर छोट्या पशुंना ४ ते ६ किलोचा खुराक द्यावा. दरम्यान चार दिवसापुर्वी कापण्यात आलेला चारा जनावरांना देऊ नये. गायींना चारा बीट खाऊ घातल्यानंतर गायींच्या दुधाच्या उत्पादनात दहा टक्के वाढ झाल्याचे कंवर म्हणाले. एका एकर साठी दोन ते अडीच किलो बियाणे लागते. जोमोन, मोनरो, जेके कुबेर आणि जेरोनिमो हे चारा बीटचे चांगले वाण आहेत. मध्यप्रदेश, हरियाणा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, महाराष्ट्रातही या चारा पिकाचे चांगले उत्पादन आले आहे.

बीट चाऱ्याची लागवड आणि पेरणी प्रक्रिया

पिकाला बारीक बीजकोश आवश्यक आहे आणि ते सरींच्या कड्यावर लावले पाहिजे. पेरणीपूर्वी ३-४ आठवडे माती फिरत्या नांगराने शेत नांगरणे आवश्यक आहे, २० सेंटीमीटर उंचीच्या कड्यांना ७० सेमी अंतरावर बंधारा तयार करणे आवश्यक आहे. एका एकराततील १,००,००० रोपे तयार होण्यासाठी सुमारे २.० ते २.५ किलो बियाणे आवश्यक आहे. बिया सरींच्या कड्याच्या एका बाजूला २ ४ सेमी खोलीवर आणि झाडांमधील अंतर २० सेमी ठेवावे लागते.




## जागतिक दिवस
## राष्ट्रीय युवा दिवस

### महत्वाच्या घटना

१७०५ : सातारा ही मराठा साम्राज्याची राजधानी करण्यात आली.
१७०८ : मराठा साम्राज्याचे पाचवेछत्रपती शाहू संभाजी भोसले महाराजांचाराज्याभिषेक केल्या गेल्या.
१९१५ : महिलांना मतदानाचा अधिकार देण्याचा प्रस्ताव अमेरिकन संसदेने फेटाळला.
१९३१ : सोलापूरचे क्रांतिवीर किसन सारडा, मल्लाप्पा धनशेट्टी व कुरबान हुसेन यांना फाशी
१९३१ : प्रसिद्ध पाकिस्तानी कवी अहमद फ़राज़ यांचा जन्म.
१९३६ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मांतराची त्रिवार घोषणा
१९३६ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांचा जन्म.
१९४९ : माजी संसद चे सदस्य पारसनाथ यादव यांचा जन्म.
१९६४ : राजनीतिज्ञ अजय माकन यांचा जन्म.
१९६४ : उत्तर प्रदेश चे माजी उपमुख्यमंत्री तसेच राजनीतिज्ञ दिनेश शर्मा यांचा जन्म.
१९७२ : काँग्रेस च्या खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांचा जन्म.
१९८४ : स्वामी विवेकानंदयांच्या जन्मदिवसानिमित्त प्रत्येक वर्षी या दिवशी ''राष्ट्रीय युवा दिवस'' म्हणून साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.
१९९७ : सामाजिक कार्यकर्त्या गंगुताई पटवर्धन यांना महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतर्फे दिला जाणारा पहिला 'बाया कर्वे पुरस्कार' प्रदान
२००५ : राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना
२००६ : हज यात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत ३६२ यात्रेकरुंचा मृत्यू
२००७ : ''रंग दे बसंती'' या चित्रपटाला ब्रिटिश ॲकेडमी फिल्म पुरस्कारासाठी निवडल्या गेले.
२००९ : जगप्रसिद्ध ए. आर. रेहमान हे गोल्डन ग्लोब अवार्ड मिळणारे पहिले भारतीय ठरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५९८ : राजमाता जिजाबाई (मृत्यू: १७ जून १६७४)
१८५४ : व्यंकटेश बापूजी केतकर विख्यात गणिती व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्योतिर्विद (मृत्यू: ३ ऑगस्ट १९३०)
१८६३ : स्वामी विवेकानंद भारतीय तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार करणारे तत्त्वज्ञ, रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य, गुरुंची स्मृती चिरंतन राहावी यासाठी त्यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. (मृत्यू: ४ जुलै १९०२)
१८६९ : भारतरत्न पुरस्कारानेसन्मानित शास्त्री भगवान दास यांचा जन्म.
१८९३ : हर्मन गोअरिंग जर्मन नाझी (मृत्यू: १५ आक्टोबर १९४६)
१८९९ : पॉल हर्मन म्युलर डी. डी. टी. या पदार्थाचा अनेक कीटकांवर संपर्कजन्य विषारी परिणाम होतो या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक (१९४८) मिळवणारे स्विस रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १२ आक्टोबर १९६५ बेसल, स्वित्झर्लंड)
१९०२ : महर्षी न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद तत्त्वज्ञ, विचारवंत, योगी, स्वातंत्र्य सैनिक आणि लेखक (मृत्यू: १३ जुलै १९६९)
१९०६ : पं. महादेवशास्त्री जोशी साहित्यिक, भारतीय संस्कृतीकोषाचे व्यासंगी संपादक (मृत्यू: १२ डिसेंबर १९९२)
१९१७ : महर्षी महेश योगी (मृत्यू: ५ फेब्रुवारी २००८)
१९१८ : सी. रामचंद्र संगीतकार (मृत्यू: ५ जानेवारी १९८२)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९७ : सर आयझॅक पिटमॅन शॉर्टहँड या लघुलिपीचे जनक (जन्म: ४ जानेवारी १८१३)
१९२४ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक गोपीनाथ साहा यांचे निधन.
१९३४ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक सूर्य सेन यांचे निधन.
१९४४ : वासुदेव गणेश तथा वासुकाका जोशी लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, चित्रशाळेचे विश्वस्त (जन्म: २८ एप्रिल १८५४)
१९६६ : नरहर विष्णू तथा 'काकासाहेब' गाडगीळ स्वातंत्र्यसैनिक, लेखक, वक्ते, राजकीय नेते, केंद्रीय मंत्री आणि पंजाबचे राज्यपाल (जन्म: १० जानेवारी १८९६)
१९७६ : ॲगाथा ख्रिस्ती इंग्लिश रहस्यकथालेखिका, पहिल्या महायुद्धाच्या काळात त्या रेडक्रॉस इस्पितळात काम करत होत्या. त्यावेळेस त्यांनी 'मिस्टिरियस अफेअर्स अँड स्टाइल्स' ही पहिली रहस्यकथा लिहिली. ६८ कादंबर्या, १०० हून अधिक कथा, १७ नाटके अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. त्यांचे साहित्य १०३ भाषांत अनुवादित झाले आहे. (जन्म: १५ सप्टेंबर १८९०)
१९९२ : शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकलीमठ ऊर्फ ' कुमार गंधर्व' (जन्म: ८ एप्रिल १९२४)
१९९७ : ओ. पी. रल्हन हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक व अभिनेते. 'तलाश', ' फूल और पत्थर', 'हलचल', 'पापी, 'शालिमार' हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत.
२००५ : अमरीश पुरी आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त केलेले चित्रपट व रंगमंच कलाकार (जन्म: २२ जून १९३२ लाहोर, पंजाब, पाकिस्तान)

# मंठ्यात संतापाचा उद्रेक!

## अष्टविनायक गणपती मंदिरावरील भगवे झेंडे हटविल्याने हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या

मंठा। प्रतिनिधी

शहरातील देवी रोड येथील श्री अष्टविनायक गणपती मंदिराच्या परिसरात लावलेले भगवे झेंडे व लाकडी बॅरिकेट जबरदस्तीने काढून फेकल्याच्या घटनेने संपूर्ण हिंदू समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला असून, दोषींवर तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



या संदर्भात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी मंठा पोलीस निरीक्षक मनोज कुमार राठोड यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देवी रोड येथील श्री अष्टविनायक गणपती मंदिर हे अनेक वर्षांपासून अस्तित्वात असून धर्मदाय कार्यालयात विधिवत नोंदणीकृत आहे. या मंदिरात नियमित पूजा-अर्चा, चतुर्थीची आरती होत असून दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येतात.असे असताना, दि. ८ जानेवारी २०२६ रोजी नगर पंचायतचे काही अधिकारी व कर्मचारी मोठ्या जमावासह मंदिर परिसरात दाखल झाले आणि ट्रस्टींच्या वतीने लावण्यात आलेले लाकडी बांबूचे बॅरिकेट तोडून त्यावरील भगवे झेंडे काढून रस्त्यावर फेकून दिले. ही कृती म्हणजे हिंदू धर्माच्या प्रतीकांचा जाहीर अपमान असून धार्मिक भावना जाणीवपूर्वक दुखावण्याचा प्रकार आहे, असा गंभीर आरोप विश्व हिंदू परिषदने केला आहे.इतकेच नव्हे तर, मंदिराच्या ट्रस्टींना धक्का-बुक्की करण्यात आली, तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर दिगंबर मुळे, राधाकिसन बोराडे, लक्ष्मण बोराडे, संजय गायकवाड, आसाराम काकडे, सिताराम चव्हाण, दीपक गायकवाड, दिनेश चिंचणे, तानाजी शेंडगे, संतोष तिवारी, सोपान शेंडगे, कल्याण वायाळ, मोहन चव्हाण, अशोक खरात आदी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. दरम्यान, प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास मंठा तालुक्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारले जाईल, असा इशारा विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने दिला असून या घटनेचे पडसाद संपूर्ण तालुक्यात उमटण्याची शक्यता आहे.

# महानगरपालिका निवडणूक; मतदानासाठी यंत्रणा सज्ज -जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

जालना महानगरपालिका निवडणूक साठी जिल्हा प्रशासनाने तयारी पूर्ण केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.२९१ केंद्रांवरील २.४५ लाख मतदारांना २२४ बीएलओ मार्फत 'पोलिंग चिट'चे वाटप १४ जानेवारी रोजी सिद्दिकी इंजिनिअरिंग येथून मतदान पथके केंद्रांकडे रवाना होणार जालना मनपावृत्त: जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची मतदान प्रक्रिया गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तिसरे आणि अंतिम प्रशिक्षण आज, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी यशस्वीपणे संपन्न झाले.



आजचे प्रशिक्षण सेंट मेरीज हायस्कूल, देऊळगाव राजा रोड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (टाऊन हॉल) येथे दोन सत्रांत आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणादरम्यान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांना ईव्हीएम हाताळणी, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीची कर्तव्ये आणि तांत्रिक बाबींचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणास १३८८ कर्मचाऱ्यांनी उपस्थिती दर्शविली असून, गैरहजर ४४ कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित आहे) मतदान पथकांचे प्रस्थान मतदान केंद्रांवर नियुक्त सर्व पथके बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी मतदानाच्या साहित्यासह केंद्रांकडे रवाना होतील. यासाठी मे. सिद्दिकी इंजिनिअरिंग, नवीन एमआयडीसी, फेज ३, छत्रपती संभाजी नगर रोड येथे वितरण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. येथून सर्व पथकांना ईव्हीएम आणि इतर आवश्यक सामुग्रीचे वाटप करण्यात येईल. निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील एकूण २९१ मतदान केंद्रांवरील २ लाख ४५ हजार ९२९ मतदारांना माहिती देण्यासाठी २२४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बीएलओमार्फत प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन 'पोलिंग चिट' वाटप करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.निवडणूक प्रक्रिया निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी आदर्श आचारसंहिता कक्ष अहोरात्र कार्यरत आहे. आतापर्यंत इंदेवाडी चेकपोस्टवर १५.२७ लाख आणि छत्रपती संभाजीनगर टोलनाका येथे ९८ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. जालना शहर महानगरपालिका प्रशासन १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी पूर्णतः सज्ज झाले असून, जालना शहर महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीकरता नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# निवडणुकीत शाब्दिक हल्ल्याचे वार बोथट!

## आरोप-प्रत्यारोपांना बाय बाय; वैयक्तिक प्रचारावर भर, विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी

अहिल्यानगर। प्रतिनिधी

मनपा निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीला वेग आला असून, थंडीत राजकीय वातावरण तापले आहे. महायुतीमधील भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र तर शिवसेना स्वतंत्र लढत असल्याने एकमेकांवर जहरी टीका, शाब्दिक वार बोथट झाले आहे. त्यामुळे निवडणुकीत विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे. टीकेच्या तलवारी म्यान केल्याने आरोप-प्रत्यारोपांना सध्या बाय बाय दिल्याचे चित्र निवडणुकीत दिसत आहे. महापालिकेच्या ६३ जागांसाठी २८३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. भाजप तीन व राष्ट्रवादीचे दोन असे पाच उमेदवार बिनविरोध म्हणून निवडून आले आहेत. राष्ट्रवादी व भाजप यांच्यात युती असल्याने ते एकत्रित निवडणुकीला सामोरे जात आहे. भाजप २९, राष्ट्रवादी काँग्रेस ३२ जागा लढवत आहे. तर शिवसेनेचा शिंदे गट स्वतंत्ररित्या रिंगणात असून सर्वाधिक ३९ उमेदवार मैदानात उतरविले आहे. याशिवाय महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार गट २९, उबाठा शिवसेना २१, काँग्रेस १०, मनसे ७, एमआयएमने ६, बसपा ५, सपा ५, वंचित २, एकलव्य ५, आप ६ तर अपक्ष ८१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे.

शहरातील मध्य शहरासह केडगाव उपनगरात तुल्यबळ लढत आहे. काही प्रभागात भाजप- राष्ट्रवादी युती व शिवसेनेत चुरस आहे. काही ठिकाणी मविआच्या उमेदवारांनी आव्हान दिले आहे. सध्या प्रचाराला वेग आला आहे. वैयक्तिक प्रचारावर भर दिला जात असून, घरोघरी जात गाठीभेटी घेतल्या जात आहे. सोशल मीडियातून मतदारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यातच प्रभागाची रचना मोठी असल्याने उमेदवारांची दमछाक होत आहे. थंडीचा कडाका असल्याने सकाळी उशिरा प्रचार सुरू होत आहे. काहींच्या प्रतिष्ठेची तर काहींसाठी अस्तित्वेची लढाई सुरू झाली आहे. महापालिका निवडणुकीत एकमेकांवर जहरी टीका करण्याऐवजी विकासकामाच्या मुद्द्यावर भर दिला जात आहे. सध्या प्रभागात काय विकासकामे केली, भविष्यात काय कामे करणार यावरच भर आहे. काही प्रभागात हाय व्होल्टेज लढत असल्याने याठिकाणी तणावपूर्ण वातावरण आहे. पोलीस प्रशासनाकडून अशा ठिकाणी लक्ष देण्यात आले असून, याचा आढावा घेतला जात आहे. भाजप- राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांनी नगरमध्ये रॅली काढत सभा घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभा घेत वातावरण निर्मिती केली. एमआयएमसाठी खा. असुद्दीन ओवेसी यांची ११ जानेवारीला मुकुंदनगरमध्ये सभा होणार आहे. शिवसेनेच्या उमेदवाराठी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांची सभा झाली. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार हेही प्रचार सभा घेणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे शेवटच्या टप्प्यात राजकीय वातावरण तापणार आहे.

# चुकीच्या पद्धतीने मुरुम उपसाप्रकरणी कंत्राटदार वर कारवाई

## शासनाचे रस्त्याचं काम बंद; वाळू माफियावर कारवाई का होत नाही?

जालना । प्रतिनिधी

बदनापूर तहसील हद्दीमध्ये वाळू माफ यावर कारवाई न करता मुरूम वाहतूक करण्यावर कारवाई वाळू माफ्यावर कारवाई करणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. बदनापूर तहसील विभागाच्या कर्मचारी अधिकाऱ्याकडून चुकीच्या पद्धतीने शासनाच्या कामासाठी मुरूम नेणारे कंत्राटदार व्ही सेठी यांच्या वाहनावर कारवाई करून पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत सविस्तर माहिती अशी की शासकीय कामासाठी अंदाजपत्रकामध्ये रॉयल्टी कपात केलेली असते तसेच रॉयल्टी भरण्यासाठी परवानगी पण मागविण्यात येते परंतु बदनापूर तहसील कार्यालया मधून चलन घेऊन परवानगी देण्यासाठी टाळाटाळ करण्यात येते यामुळे शासनाच्या कामास सुरू करण्यासाठी विलंब होतो.



या कारवाईमुळे शासनाचा रस्ता बदनापूर ते चिखली काम बंद पडले आहे. या मुरूम प्रकरणी दंडत्मक कारवाई करता येत नाही असा पण शासनाचा जीआर आहे तसेच शासकीय काम सुरू असताना संबंधित गुत्तेदार यांना नोटीस देणे गरजेचे असते कोणतेही नोटीस न देता तहशील विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कारवाई केली. चार महिन्यापासून तहसील कार्यालयामध्ये शासकीय कामासाठी मुरूम घेण्याकरता मागणी करण्यात येते परंतु परवानगी देण्यात येत नाही.

रामखेडा येथील दुधना नदीपात्रात अवैध गौण खनिज उपसाप्रकरणी शासकीय कंत्राटदार व्ही. पी. सेठी यांची ५ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

सदरील कारवाई कर्मचारी काकासाहेब जाधव, विलास जारवाल, बबन घुगे, ग्राम महसूल अधिकारी हारेश तांबोळी आणि चालक इंद्रजीत कान्हेरे यांना सोबत घेऊन शासकीय वाहनाने सायंकाळी साडेसहा वाजता रामखेडा येथे दुधना नदीपात्रात ४ हायवा आणि एक पोकलँडच्या माध्यमातून मुरुमाचे अवैध उत्खनन सुरु असल्याचे दिसून आले. म्हणून याप्रकरणी बदनापुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार यांनी मतदान केंद्रांची केली पाहणी

जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार यांनी शहरातील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील मूलभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेतला.यावेळी त्यांनी शहरातील प्राथमिक शाळा, नूतन वसाहत, ऑक्सफर्ड स्कूल, व्ही. एस. एस. कॉलेज, आर. एच. व्ही. हिंदी विद्यालय, सी. एस. एम. के. विद्यालय तसेच सेंट मेरी स्कूल अशा एकूण ०६ ठिकाणी असलेल्या ४० मतदान केंद्रांची पाहणी केली.



पाहणीदरम्यान मतदान केंद्रांवरील पुरेशी प्रकाश व्यवस्था, दार-खिडकींची स्थिती, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची उपलब्धता याबाबत सखोल तपासणी करण्यात आली. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व मतदान केंद्रांवरील मूलभूत सुख-सुविधा वेळेत व योग्य प्रकारे उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना मा. निवडणूक निरीक्षकांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या पाहणीवेळी शहर अभियंता सय्यद सऊद, पाणीपुरवठा अभियंता अनिल भद्रे, विद्युत अभियंता श्रीमती कोमल गावंडे तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व सुरक्षित पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# धनादेश अनादर प्रकरणी व्यावसायिकाला तीन महिने कारावास

जालना । प्रतिनिधी

व्यवहारापोटी दिलेले वीस लाख रुपयांचे दोन धनादेश बँकेत अनादरीत झाल्याप्रकरणी जालना येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस. के. दुगावकर यांनी व्यावसायिकास दोषी ठरवत तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली असून वीस लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत.

साहित्य खरेदी व्यवहारात १५ लाख आणि ०५ लाख रुपयांचे दोन धनादेश दिले होते.खात्यात पुरेशा रक्कमे अभावी धनादेश अनादरीत झाले. कायदेशीर नोटीस बजावूनही थकीत रक्कम भरली नाही.त्रस्त झालेल्या एक व्यक्ती यांनी न्यायालयात धाव घेतली.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने एका व्यक्तीला कलम १३८ अंतर्गत दोषी ठरवत तीन महिने साधा कारावास, नुकसान भरपाई पोटी २० लाख रुपये एका महिन्याच्या आत द्यावे , मुदतीत न दिल्यास एक महिना अतिरिक्त कारावासाची शिक्षा. असा निकाल दिला. तक्रारदारांच्या वतीने अॅड. पी. के. मुळे यांनी काम पाहिले.

# अखेर चिमुकल्यांच्या आक्रोशाने जिल्हा प्रशासन जागे

## सव्वा दोन महिन्यांपासून लिंबाच्या झाडाखाली शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा 'वनवास' संपला

बीड। प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवण जिल्हा परिषद शाळा केंद्रांतर्गत येणाऱ्या दत्तनगर वस्तीशाळेच्या विद्यार्थ्यांना अखेर त्यांच्या हक्काची शाळा इमारत मिळाली आहे. शाळेसाठी सुसज्ज इमारत उपलब्ध असतानाही शाळेकडे जाणारा रस्ता अतिक्रमणामुळे बंद झाल्याने गेल्या सव्वा दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली, उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत होते. या गंभीर प्रकरणी शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व पालकांनी वरिष्ठ कार्यालयांकडे वारंवार लेखी निवेदने सादर केली होती; मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नव्हती.




अखेर सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली सहकारी, शिक्षणप्रेमी, पालक व विद्यार्थ्यांनी दि. ०५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी ''जिल्हाधिकारी जागे व्हा'', ''पालकमंत्री अजित पवार जागे व्हा'', ''आ. विजय सिंह पंडित जागे व्हा'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यानंतर विद्यार्थ्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधत तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना तातडीने शाळेचा रस्ता खुला करण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दि. ०९ (शुक्रवार) रोजी गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक, तलाठी राहुल भदे व ग्रामविकास अधिकारी प्रतापसिंह नाईक यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देत पंचनामा केला. शाळेकडे जाण्यासाठी तीन मार्ग खुले करण्यात आले असून आता वर्ग पुन्हा शाळेच्या इमारतीत सुरू करण्यात आले आहेत.यासंदर्भात गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांनी सांगितले की, ''वरिष्ठांच्या आदेशानुसार रस्ता खुला करण्यात आला आहे. भविष्यात शाळेच्या मार्गात कोणीही अडथळा निर्माण केल्यास नियमानुसार संबंधितांविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला जाईल. पार्श्वभूमी दत्तनगर वस्तीशाळेसाठी २००७०८ मध्ये शाळा इमारत बांधण्यात आली होती; मात्र अतिक्रमणामुळे शाळेकडे जाणारा मार्ग बंद झाला होता. कडाक्याच्या थंडीत विद्यार्थ्यांना उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत असल्याने पालक व शिक्षणप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता. अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून चिमुकल्यांचा 'वनवास' संपला आहे. चिमुकल्यांचा आवाज शासनदरबारी बुलंद करणाऱ्या प्रसारमाध्यमांचे पालक, विद्यार्थी व शिक्षणप्रेमींच्या वतीने डॉ. गणेश ढवळे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# हिवरेबाजार विद्यालयाचे शासकीय चित्रकला परीक्षेत घवघवीत यश



अहिल्यानगर। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत हिवरेबाजार येथील यशवंत माध्यमिक विद्यालयातील ९९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इलेमेंटरी परीक्षेत ४४ तर इंटरमिजिएट परीक्षेत ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विदयालयचा ९७ टक्के निकाल लागला असून एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत श्रुतिका संतोष ठाणगे हिने 'अ' श्रेणी प्राप्त केली तर साहिल शिवाजी महांडुळे,संस्कृती रविंद्र वैराळ, भार्गवी भानुदास बांगर, हर्षदा गणेश पाटील, प्रांजल पोपट गोहड यांनी 'ब' श्रेणी संपादन केली. इंटरमिजिएट परीक्षेत तृप्ती शहाजी गोहड, सुरज संतोष ठाणगे, श्रावणी राजेश वाबळे, तनुश्री दत्तात्रय पादीर यांनी 'ब' श्रेणी संपादन केली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पदमश्री डॉ. पोपटराव पवार, सरपंच विमलताई ठाणगे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहिदास पादीर, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हॉइस चेअरमन जालिंदर चत्तर, एस. टी. पादीर सर, सहदेव पवार गुरुजी, मंगेश ठाणगे मेजर, राजू ठाणगे मेजर, मुख्याध्यापक मुरलीधर अमृते, सर्व शिक्षक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी विशेष कौतुक आणि अभिनंदन केले

दैनिक
# राज्य लोकतंत्र

सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ | ६

# मंत्री पंकजाताई-आ.धस यांची जवळीक आगामी जि.प., पं.स.निवडणूकीची नांदी

## आष्टी-पाटोदा-शिरूरमध्ये यांचे मनोमिलन भाजपाला लीड मिळवून देणार

**पाटोदा । प्रतिनिधी**

**गहिनीनाथ गडावर पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे आणि आ.सुरेश धस यांचे मनोमिलन झालेले दिसून आले. आ.धस यानी पंकजाताईंचे जोरदार स्वागत केले. आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघामध्ये पंकजाताईंना मानणारा मोठा वर्ग आहे आणि या मतदारसंघावर आ.सुरेश धस यांचीही पकड आहे. या दोघांचे एकत्र येणे म्हणजे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीची नांदीच ठरणार आहे. या दोघांच्या एकत्रिकरणामुळे या तिन्ही तालुक्यामध्ये भाजपाला मोठी लीड मिळणार यात काही शंका नाही.**



धस ज्या आष्टी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात तिथं गोपीनाथ मुंडे साहेबांना मानणारा वर्ग असून त्यांचे मतदान जिल्हा परिषद निवडणूकीत निर्णायक ठरते.याआधी जेव्हा सुरेश धसांनी भाजप प्रवेश केला नव्हता तेव्हा त्यांनी जिल्हा परिषदेत निवडून आलेल्या सदस्यांनी भाजपचा जिल्हा परिषद अध्यक्ष बनवण्यासाठी भाजपला मदत केली होती.त्या बदल्यात भाजपने आणि पंकजा मुंडेंनी सुरेश धसांना बीड-लातूर-उस्मानाबाद स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यातून विधानपरिषदेत आमदार म्हणून पाठवले.

त्यांच्यात वितुष्ट येण्याचे कारण म्हणजे पंकजा मुंडेंना बायपास करून ऊसतोड मजूर संघटना,मुकादम आणि कामगार यांच्या प्रश्नांत लक्ष घालणं. त्याचबरोबर लोकसभेत आष्टीतून भाजपचा म्हणजेच पंकजा मुंडेंचा पराभव करण्यात समाजाचे नाव पुढे करून उचललेला वाटा.त्याला प्रत्युत्तर म्हणून आष्टी विधानसभेत धसांच्या विरोधात पंकजानी दिलेला संदेश!

राजकिय विरोध प्रतिरोधाच्या पुलाखालून भरपूर पाणी वाहून गेल्यानंतर आता दोन्ही नेत्यांना येणाऱ्या जिल्हापरिषद निवडणूकीला पक्ष म्हणून एकत्रित सामोरे जायचे आहे. बीड जिल्हा परिषद निवडणूकीत भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी मिळून लढली तर निवडणूक सोपी असेल पण जर वेगळे लढले तर मात्र बीड जिल्ह्यात भाजपचे आमदार आणि भाजपच्या बीड जिल्ह्यातून मंत्री असलेल्या पंकजा मुंडे यांना मिळूनच काम करावे लागेल.त्यासाठी त्यांचे कितीही व्यक्तिगत मतभेद असतील तरी पक्षाला रिझल्ट देण्यासाठी आणि आपले वर्चस्व दाखवण्यासाठी त्यांना एकत्र यावेच लागेल.त्याचवेळी धसांना पंकजांच्या मदतीने आष्टी तालुक्यातील धोंडे गटालाही कॉर्नर करता येईल.

सुरेश धसांनी पंकजा मुंडेंच्या स्वागताला जाऊन एक पाऊल पुढे टाकले तर पंकजा मुंडेंनी धस यांच्यासोबत दर्शन घेताना फोटो काढून आणि ते फोटो सोशल मीडियावर व्हायरल करून दोघे एकत्र आल्याचा दुजोरा दिला. त्याचबरोबर आपणच जिल्ह्याच्या भाजपच्या नेत्या आहोत आणि भाजपच्या हेही पंकजांनी दाखवून दिले.याआधीही भाजप जिल्हाध्यक्ष निवडीत आणि कार्यकारिणी सदस्य निवडीत सुरेश धसाना बाजूला सारून पक्षाने पंकजा मुंडेंच्याच निवडीला प्राधान्य दिलेले होते.तिथेच धसांना त्यांचे भाजप पक्षातील वजन समजले आहे.याचा अर्थ धस यांचा जिल्ह्यात प्रभाव नाही असा होत नाही. धस जिल्ह्यातील एका मोठ्या विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतात. त्याचबरोबर याआधी लोकसभा निवडणूक ◀◀ पान ३ वर

# खुनाच्या गुन्ह्यात सहा वर्षांपासून फरार आरोपीस गेवराई पोलिसांनी घेतले ताब्यात

बीड । प्रतिनिधी

कुणाच्या गंभीर पुण्यामध्ये गेल्या सहा महिन्यापासून फरार असलेल्या आरोपीला गोपनीय माहितीच्या आधारे गेवराई पोलिसांनी सापळा रचून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले

फरारी आरोपीतांचा शोध घेत असतांना दिनांक १०.०१.२०२६ रोजी किशोर पवार, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे गेवराई यांना गोपनिय माहिती मिळाली की, पोलीस ठाणे गेवराई येथे दाखल गुरनं. ३४७/२०१९, कलम-३०२, १२०(ब), १४३, १४७, १४८, १४९ भा.दं. वि. अन्वये दाखल गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी त्याच्या घरी आला आहे. त्याअनुषंगाने पोनि. किशोर पवार यांनी सदरची माहिती मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, मा. पोलीस उप अधीक्षक श्री. अनिल कटके यांना देऊन पोलीस ठाणे गेवराई येथे नियुक्तीस असलेले सपोनि. संतोष जंजाळ, पोउपनि. संजय उदगीरकर, श्रेणी पोउपनि. श्रीमंत उबाळे, पोह/२२३ कल्याण राठोड, पोकॉ/८१९ रामराजे काकडे व पोकॉ/२४१ गोरक्ष डोके यांचे पथक रवाना केले.

सदर पथकाने आरोपीच्या घराजवळ सापळा लावला असता आरोपीस पोलीसांचा सुगावा लागल्याने आरोपीने घरातून पळ काढला असता पथकाने अंदाजे एक किलोमीटर पाठलाग करून आरोपीस ताब्यात घेतले. त्यास पोलीस ठाणे गेवराई येथे आणून गुरनं. ३४७/२०१९, कलम-३०२, १२०(ब), १४३, १४७, १४८, १४९ भा.दं. वि. अन्वये दाखल गुन्ह्याचा अभिलेख तपासला असता गुन्हा घडला त्यावेळी सदर आरोपी बालक असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर विधीसंघर्षग्रस्त बालकास मा.बाल न्याय मंडळ बीड यांचे समक्ष हजर करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि. संजय उदगीरकर हे करत आहेत.सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, मा. अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, मा.पोलीस उप अधीक्षक श अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि. संतोष जंजाळ, पोउपनि.श संजय उदगीरकर, श्रेणी पोउपनि. श्रीमंत उबाळे, पोहकल्याण राठोड, पोकरामराजे काकडे व पोकॉ गोरक्ष डोके यांनी केली.

# जिल्ह्यातील पोलिस पाटील भरतीचे आरक्षण निश्चित पण जाहिरातीकडे इच्छुकांचे लक्ष

**बीड। प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील ११७९ रिक्त पदासाठी दि.३० डिसेंबर पर्यंत आरक्षण प्रक्रिया पुर्ण करण्याचे जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकायाना दिले ले आहेत.त्यानुसार माजलगाव-२४ डिसेंबर,धारुर,वडवणी,केज, अंबाजोगाई,परळी,बीड,गेवराई,शिरुर कासार-२६ डिंसेबर, पाटोदा,आष्टी-१ जानेवारी असे सर्व उपविभागात आरक्षण सोडत होऊन आक्षेप-हरकतीचा कालावधी उलटून आठवडा उलटला आहे तरी पुढील प्रक्रियेस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडुन जाहिरात काढुन भरतीचा पुढील वेळापत्रक काढण्यास विलंब होताना दिसुन येत आहे.अनुसुचित जाती-१३७,अनुसुचित जमाती-८७,वि.जा.अ.-३९,भ.ज.ब.-३५,भ.ज.क.४६-भ.ज.ड.-२१, विशेष मागास वर्ग-२५,इतर मागास वर्ग-२४६,एसईबीसी-११८,आ.दु.घटक-१३०,अराखीव -२९५ असा एकुण ११७९ पदासाठी जिल्ह्यात ही भरती होत असून महिला साठी ३०% पदे राखीव ठेवण्यात आलेली आहेत.जालना जिल्ह्यातील भरती झालेली आहे.हिंगोली जिल्ह्याची जाहिरात निघुन वेळापत्रक जाहीर झाले आहे.मात्र बीड जिल्ह्यातील पोलिस पाटील भरतीचा विधानसभेच्या सर्वोच्च सभागृहात विषय होऊनही बीड जिल्ह्यात पोलिस पाटील पद भरतीकडे जिल्हा प्रशासनासह पालकमंत्री, लोकप्रतिनिधी कडुन पाहिजे तसे लक्ष नाही.तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष घालुन बीड जिल्ह्यातील पोलिस पाटील भरतीचा विषय लवकरात लवकर जाहिरात काढुन वेळापत्रक ठरवुन मार्गी लावावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मुकेश रसाळ यांनी पोलिस पाटील पद भरतीची जाहिरात केव्हा निघते? अशी चातकासारखी वाट पाहणा-या उमेदवाराच्या वतीने केली आहे.

# माजलगावात योगासन व प्राणायाम शिबिराचे आयोजन, स्वामी देवव्रत सरस्वती यांचे मार्गदर्शन

माजलगांव । प्रतिनिधी

येथील आर्ष योग संस्थान शाखेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही योगासन व प्राणायाम शिबिराचे मंगळवार दि.१३ जानेवारी ते २० जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



येथील वैष्णवी मंगल कार्यालयात होणाऱ्या या आठ दिवसीय शिबिरात आर्य जगताचे प्रसिद्ध योग व आयुर्वेद तज्ञ आचार्य स्वामी देवव्रतजी सरस्वती यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. गेल्या ३९ वर्षापासून आजतागायत माजलगाव शहर व परिसरातील नागरिकांचे माता भगिनींचे विद्यार्थी विद्यार्थिनींचे आरोग्य निरोगी राहण्याच्या उद्देश्याने आर्ष योग संस्थान अशा प्रकारचे योगासन व प्राणायाम शिबिर दरवर्षी आयोजित करीत आलेले आहे. येथे मंगळवार दि.१३ जानेवारी पासून दि.२० जानेवारी पर्यन्त दररोज सकाळी पुरुष व महिला साठी ५.३० ते ७.३० आणि विद्यार्थ्यांना सायंकाळी साडेपाच ते साडेसहा या वेळेत ही शिबीर पार पडणार आहे.तर शंख प्रक्षालन रविवार दि.१८ जानेवारी रोजी सकाळी ८ ते १ या वेळेत होणार आहे.

योगश्चित्त वृत्तिनिरोध

चित्त वृत्तींचा निरोध ही योग आहे ,स्वस्थ व निरोगी शरीरातच स्वस्थ निरोगी मन राहते असे म्हटले जाते,आणि स्वस्थ व निरोगी तनमन असणाराच व्यक्ती सुखी व समाधानी होऊन कुटुंब , समाज ◀◀ पान ३ वर

# अनिकेत आमटे आज शांतिवनात, पुस्तक प्रकाशन सोहळ्याला उपस्थिती

शिरूर कासार । प्रतिनिधी

शांतिवन संस्था व समाजसेवक दिपक नागरगोजे यांच्या हस्ते लिखित पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे दि.१२ जानेवारी युवा दिन व जिजाऊ जयंती निमित्ताने आयोजन करण्यात आले असून या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला अनिकेत प्रकाश आमटे, सामाजिक कार्यकर्ते लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा, भामरागड यांची उपस्थिती लाभणार आहे.



समाजसेवक दिपक नागरगोजे लिखित गुलामीच जिण,अंधारातल जगणं या पुस्तकाचे जागतिक दर्जाचे जेष्ठ संपादक अभय वैद्य यांनी इंग्रजीत अनुवादित करून,ए लाईफ इज बोंडेज ए लाईफ इन डार्कनेस'असे पुस्तक निर्मिती केली आहे तर दुसरे हिरवं सपान या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन शांतीवन या ठिकाणी करण्यात आलेले आहे सामाजिक कार्यकर्ते अनिकेत आमटे यांच्यासह अशोक तांगडे,अध्यक्ष बाल कल्याण समिती बीड यांची उपस्थिती असणार आहे या पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आव्हान समकालीन प्रकाशन पुणे, उत्कर्ष प्रकाशन पुणे व शांतीवन परिवार आर्वी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंशराशिकरण व उपदानाबाबत सचिवांशी सकारात्मक चर्चा -अनिल जाधवर

**बीड। प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्तीनंतरचे अंश राशीकरण व उपदान हे आर्थिक लाभ एप्रिल २०२४ पासून प्रलंबित आहेत. ह्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक समन्वय समिती गठीत करण्यात आली असून समितीमध्ये कास्ट्राईब जनरल संघ, महाराष्ट्र शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघटना, सेवानिवृत्त शिक्षक संघटना, प्राथमिक शिक्षक संघ यांचा समावेश आहे . सेवानिवृत्त शिक्षक समन्वय समितीने शिक्षकांचे आर्थिक लाभ जानेवारी अखेर मिळावेत नसता आमरण उपोषण करण्याचा लेखी इशारा निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष भेटून माननीय वित्त सचिव, माननीय शिक्षण सचिव,शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक पुणे यांना दिलेला आहे . निवेदनाच्या प्रती पालकमंत्री तथा वित्तमंत्री नामदार अजितदादा पवार, माननीय नामदार पंकजाताई मुंडे, सन्माननीय सर्व विधानसभा सदस्य यांना दिलेल्या आहेत .दिनांक ८ जानेवारी रोजी समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे जाऊन मंत्रालयामध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अवर सचिव वित्त विभागाचे अवर सचिव यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले व चर्चा केलेली आहे तसेच पुणे येथील शिक्षण आयुक्त व शिक्षणासंचालक प्राथमिक येथील संबंधित ◀◀ पान ३ वर



# फुलसांगवीतील सुवर्ण महोत्सव सोहळा सर्वधर्म समभावाची शिकवण देऊन गेला





शिरूर । प्रतिनिधी

वैराग्याचे महामेरू श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या जन्मभूमीतील सुवर्ण महोत्सव सोहळा हा संत विचारांची पेरणी करून जातीभेद, सर्व-धर्म समभावाची प्रभावी शिकवण देऊन गेला आहे. अन्नदान, समाज प्रबोधन, जनजागृती, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, असे समाजहिताचे उपक्रम गावकऱ्यांनी मोठ्या अट्टाहासाने राबवल्यामुळे या उपक्रमाचा डंका ही राज्यभर गाजला आहे.

उभारीला ध्वज तिन्ही लोकावरी । ऐसी चराचरी कीर्ती ज्यांची ।।

संत निळोबारायाच्या वचनाला साजेसे असे ज्यांचे जीवन होते, ज्यांना भक्तगणांकडून वारकरी सांप्रदायाचा दिव्य सूर्य म्हणून संबोधले ◀◀ पान ३ वर

# श्रीराम कथेमुळे मानवी जीवनातील आदर्श जीवनमूल्य नीतिमत्ता आणि संस्कृतीचे दर्शन घडते- महंत मंदार महाराज रामदासी



आष्टी । प्रतिनिधी

श्रीराम कथेचे महत्त्व हे मानवी जीवनातील आदर्श जीवनमूल्ये नीतिमत्ता आणि संस्कृतीचे मार्गदर्शन आहे राम कथेद्वारे आपल्याला कर्तव्य,त्याग सत्य आणि धर्माचे पालन कसे करावे याची शिकवण मिळते असे प्रतिपादन दादेगाव येथील देवदास स्वामी मठाचे महंत मंदार महाराज रामदासी यांनी केले आष्टी येथे आमदार सुरेश धस यांचे वतीने आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते यावेळी आमदार सुरेश धस आणि तालुक्यातील संत प्रवचनकार कीर्तनकार उपस्थित होते ते पुढे म्हणाले की, राम कथाही वैवाहिक जीवनातील आदर्श संबंधांपासून ते समाजातील समस्यांवर मात करण्याची प्रेरणा देते त्यातून मानसिक शांती आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते तसेच रामकथा ही सत्य धर्म आणि नीतिमत्तेच्या मार्गावर चालण्याचे मात्र शिकवते कसोटीच्या प्रसंगी ही जीवनमूल्य कशी जपायची हे त्यातून कळते राम कथा ही भारतीय संस्कृतीचा आणि साहित्याचा अविभाज्य भाग आहे श्रीराम हे विष्णूचे अवतार असल्याने राम कथा श्रवणामुळे ईश्वरी कृपेचा अनुभव येतो जीवनाचे सार संस्कृत जपाया आणि आदर्श मार्गदर्शक तत्व देणारे पवित्र महाकाव्य आहे राम कथेचे श्रवण केल्याने जीवनातील नकारात्मकता तणाव आणि भीती दूर होते तसेच मानसिक शांतता मिळते त्यामुळे श्रीराम कथेला अनन्यसाधारण महत्त्व आहे असे त्यांनी शेवटी प्रतिपादन केले.

या श्रीराम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यामध्ये उपस्थित प्रवचनकार,कीर्तनकार या संतांचे पूजन करण्यात आले विशेष ◀◀ पान ३ वर

# मकरसंक्रांतीच्या निमित्ताने युसूफवडगांवचा आठवडी बाजार फुलला

युसूफवडगांव । प्रतिनिधी

मकर संक्रांतीचा सण आता तीन दिवसावर येऊन ठेपला असुन,त्या पार्श्वभूमीवर संक्रांतीसाठी लागणाऱ्या विविध वस्तूंनी केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील आठवडी बाजार सजला आहे.

विविध वानांसह हळदी-कुंकू,चुडे,बांगड्या, रांगोळी आणि तिळगुळ खरेदीसाठी आठवडी बाजारात महिलांची मोठी गर्दी दिसून येत आहे.विशेषत: चुडे व वान खरेदीसाठी महिलांची लगबग वाढली आहे.

मकर संक्रांतीनिमित्त हळदी कुंकवासह वान देण्याची परंपरा आहे. संक्रांतीनिमित्त





दिल्या जाणाऱ्या वानासाठी महिला रोजच्या वापरातील वस्तु खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत.स्टीलच्या वाट्या, कप,ग्लास,फुलपात्र,डबे,यांसह पारंपरिक हार,बाजूबंद यांचीही खरेदी सुरू आहे. दरम्यान संक्रांतीला चुडे व बांगड्यांना विशेष महत्व आहे.हळदी कुंकू विविधरंगातील रांगोळी, सुप, दुर्डी, केरसुणी,यांनाही महिलांची पसंती मिळत आहे.संक्रांतीला विशेष मान असलेले हलव्याचे दागिने,तिळगुळाचे वान तसेच ग्रहउपयोगी वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे.बाजारात तिळाची रेवडी,गुलाबी रेवडी,लाडू, तिळवडी,चिक्की व हलवा यांनाही मागणी वाढली आहे.

# रोटरी क्लबतर्फे कर्तृत्ववान महिलांचा आदिशक्ती पुरस्काराने सन्मान होणार

गेवराई । प्रतिनिधी

समाजकार्यात नेहमीच अग्रेसर राहून निःस्वार्थपणे सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या महिलांचा रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून गेवराई तालुक्यातील पाच कर्तृत्ववान महिलांचा आदिशक्ती सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे यांनी दिली . याबाबत सविस्तर माहिती अशी की , रोटरी फौंडेशन व रोटरी इंटरनॅशनल ही सेवाभावी संस्था १४२ देश - विदेशात सामाजिक कार्य करीत सेवारत आहे . त्यांच्या संकल्पनेला साथ देण्याच्या उद्देशाने समाजामध्ये विविध क्षेत्रात , विविध प्रकारच्या व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने कार्य करीत असतात . यामध्ये उद्योग , शिक्षण, सामाजिक , वैद्यकीय ,आध्यात्मिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध क्षेत्रात आपल्या अतुलनीय कार्याबद्दल सेवा देणाऱ्या महिला कमी नाहीत . त्यांच्या कार्याचा उचित सन्मान व्हावा या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ गेवराई यांच्या वतीने तालुक्यातील पाच महिलांना आदिशक्ती सन्मान पुरस्कार देण्यात येणार आहे . या पुरस्काराचे स्वरूप महावस्त्र ,शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ असे आहे. रोटरी क्लबचे वरिष्ठ मान्यवरांच्या हस्ते या आदिशक्तींना सन्मानित केले जाणार आहे . हा रंगारंग सन्मान सोहळा बीड रोडवरील हॉटेल निसर्गमध्ये सायंकाळी सात वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न केला जाणार आहे . १९ जानेवारी ही संभाव्य तारीख ठरविण्यात आली आहे . उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी रोटरी इंटरनॅशनल ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातुरे,भावी प्रांतपाल जयेश पटेल यांच्या पत्नी सौ.पारूल पटेल ,रोटरी क्लब सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर , रोटरी क्लब अंबाजोगाईच्या अध्यक्षा प्रा . डॉ . रोहिणी पाठक आदींची उपस्थिती राहणार आहे पुरस्कारार्थींच्या निवडीसाठी एका समितीचे गठण करण्यात आले आहे . लवकरच आदिशक्ती सन्मान पुरस्कारासाठी निवडलेल्या कर्तृत्ववान महिलांची नावे जाहीर केली जातील . या उपक्रमासाठी प्रोजेक्ट चेअरमन म्हणून धर्मराज करपे काम पाहत आहेत . कार्यक्रम यशस्वीतेसाठी रोटरी क्लबचे सचिव प्रवीण जैन ,उपाध्यक्ष सुदाम धुपे, कोषाध्यक्ष सुरेश बर्गे , सहसचिव डॉ. नागनाथ मोटे , व्होकेशनल सर्व्हिस चेअरमन राजेंद्र डेंगे, क्लब डमिनिस्ट्रेशन चेअरमन गणेश कुलकर्णी आदी परिश्रम घेत आहेत .

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पूजा खेडकरच्या घरी नेपाळी कामगाराने केली चोरी, आई-वडिलांसह पाच जण बेशुद्धावस्थेत आढळले



## नेपाळी नोकराने चोरी केल्याचा संशय

**या प्रकरणी पोलिसांकडे अद्याप तक्रार प्राप्त झालेली नाही. आई-वडिलांची प्रकृती सध्या चिंताजनक असल्याने उपचारानंतर तक्रार देण्यात येईल, असे पूजा खेडकर यांनी पोलिसांना सांगितले. खेडकर यांनी त्यांच्या बंगल्यात दहा-बारा दिवसांपूर्वी नेपाळी नोकर कामास ठेवला होता. त्याने खेडकर कुटुंबीय, रखवालदार आणि इतर नोकरांना जेवणातून गुंगीचे औषध दिले. त्यामुळे ते बेशुद्ध झाले. घरातून दागिने आणि मोबाईल चोरीस गेल्याची प्राथमिक माहिती आहे. चोरीमागील नेमका प्रकार आणि लुटीचा ऐवज याबाबत तपास करण्यात येत आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी दिली.**

**पुणे । प्रतिनिधी**

वादग्रस्त बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या औंध परिसरातील बंगल्यात मध्यरात्री चोरीचा प्रकार उघडकीस आला आहे. चोरट्याने पूजा खेडकर यांच्या आई-वडिलांसह नोकरचाकर यांना बेशुद्ध करून बंगल्यातून दागिने लुटून नेले. याप्रकरणी अद्याप पोलिसांत तक्रार प्राप्त झाली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औंध परिसरात रविवारी (ता. ११) मध्यरात्री दीडच्या सुमारास नॅशनल हाउसिंग सोसायटीतील बंगल्यात हा प्रकार घडला. बंगल्यातील एका नोकराने पूजा खेडकर यांना दोरीने बांधून ठेवले. त्यानंतर त्यांचे वडील दिलीप आणि आई मनोरमा खेडकर यांना बेशुद्ध करून चोरी केल्याची माहिती पूजा खेडकर यांनी फोन करून चतुःशृंगी पोलिसांना कळवली. ही माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पाहणी केली असता बंगल्याच्या कार पार्किंग परिसरात रखवालदार जितेंद्र सिंग हा बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. खेडकर यांच्या आई-वडिलांची खोली तपासली असता ते दोघेही पलंगावर बेशुद्धावस्थेत असल्याचे दिसून आले. खोलीतील लाकडी कपाटातील साहित्य जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेले होते. तसेच बंगल्याच्या तळमजल्यावरील एका खोलीत वाहनचालक दादासाहेब ढाकणे, तर बंगल्याबाहेरील एका खोलीत स्वयंपाकी सुजित रॉय हेही बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

# आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्यात ३०० किमी दर्जेदार रस्ते तयार



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर जिल्हा आणि पिंपरी-चिंचवड भागात होणाऱ्या आंतर राष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी सुमारे तीनशे किलोमीटरचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या नियमानुसार गुणवत्ता पूर्ण असलेले रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने तयार केले आहेत. त्यामुळे ही स्पर्धा निर्विघ्नपणे पार पडेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

पुणे शहर, जिल्हा तसेच पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच जिल्हाधिकारी प्रशासनाच्या वतीने काही खासगी प्रायोजक यांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी जगभरातील २५ देशांतील नावाजलेले सायकल स्पर्धक सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील भोर, वेल्हा. मुळशी, पुरंदर, मावळ, हवेली या तालुक्यातील काही भागातील रस्ते स्पर्धेसाठी तयार केले आहेत. या सहा तालुक्यांतील सुमारे ३०० किलोमीटरच्या रस्त्यांच्या कामासाठी पीएमआरडीए (१९४ कोटी), जिल्हा नियोजन समिती (७७ कोटी) आणि शासन (२३ कोटी) या विभागांनी सुमारे २९४ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामधून १०० कि.मी.चे रूंदीकरण, उर्वरित २०० किलोमीटरचे मजबुतीकरण, डांबरीकरण, आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या नियमानुसार केले आहे. याशिवाय पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत होणाऱ्या स्पर्धेच्या रस्त्यासाठी या दोन्ही प्रशासनाने निधी खर्च केला आहे. आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी तयार केलेल्या रस्त्यांसाठी सिमेंट बेस ट्रिटेंट पद्धतीचा वापर करून पायाचे काम केले. त्यानंतर डांबरीकरण केले आहे. यामुळे या रस्त्यांच्या कामांची गॅरंटी पाच वर्षे आहे.

## लोणावळा नगर परिषदेची पहिली सभा १३ जानेवारीला; उपनगराध्यक्ष पदाची उत्सुकता

**लोणावळा । प्रतिनिधी**

लोणावळा नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर महिन्यात पार पडली. २१ डिसेंबर रोजी निकाल घोषित झाला. नगराध्यक्षपदी राजेंद्र सोनवणे हे बहुमताने निवडून आले. त्यांच्या अध्यक्षतेखाली येत्या १३ जानेवारी रोजी पहिली सभा होणार आहे. या सभेमध्ये उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवक यांची निवड केली जाणार आहे.

लोणावळा नगर परिषदेत या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता आली असल्याने पक्षाकडून कोणाला प्रथम उपनगराध्यक्ष पदाची संधी दिली जाणार, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे १६ नगरसेवक विजयी झाले असून, त्यामध्ये तब्बल ११ महिला नगरसेविका व ५ पुरुष नगरसेवकांचा समावेश आहे.

महिलांची संख्या जास्त असल्याने व त्यातही काही महिलांनी विक्रमी मते मिळवल्याने पक्षाकडून त्यांना उपनगराध्यक्ष पदाची संधी दिली जाणार की एकमेव अनुभवी नगरसेवक असलेल्या खंडाळा प्रभागातील नगरसेवकाला ही संधी दिली जाणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. सोबतच विविध पक्षातून निवडून आल्यानंतरदेखील सर्वांनी विकासाच्या मुद्द्यावर सत्ताधाऱ्यांना पाठिंबा दिला असल्याचे त्यांनादेखील सन्मानजनक पदांचे वाटप करावे लागणार असल्याने त्यांना कोणती पदे दिली जाणार, याबाबतदेखील सर्वांना उत्सुकता आहे.

## पतंग उडवताना सहाव्या मजल्यावरून पडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पतंग उडविण्यासाठी गेलेला १२ वर्षीय मुलगा इमारतीतील सहाव्या मजल्यावरून पडल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना कात्रजमधील आंबेगाव खुर्द परिसरात घडली. अर्धवट बांधकाम केलेल्या इमारतीतील जिन्याला कठडे नव्हते. दुर्घटनेस जबाबदार ठरल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. श्लोक नितीन बांदल (वय १२, रा. स्वरा क्लासिक इमारत, सिद्धिविनायक सोसायटी, आंबेगाव खुर्द, कात्रज ) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. याबाबत श्लोकचे मामा अमोल सुभाष इंगवले (वय ३५, रा. औदुंबर निवास, कात्रज गावठाण) यांनी आंबेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुर्घटनेस जबाबदार ठरल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक योगेश शिळीमकर, महेश धूत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंबेगाव खुर्द परिसरात एका गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे. गृहप्रकल्पाच्या शेजारील सोसायटीत बांदल कुटुंबीय राहायला आहेत. श्लोक पाचवीत होता. त्याचे वडील खासगी कंपनीत कामाला आहेत. गुरुवारी (८ जानेवारी) शाळा सुटल्यानंतर सायंकाळी पाचच्या सुमारास श्लोक बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत पतंग उडविण्यासाठी गेला. सहाव्या मजल्यावरून तोल जाऊन पडल्याने श्लोक गंभीर जखमी झाला. टेरेसच्या डक्टमधून तो खाली पडला होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक भोजलिंग दोडमिसे यांनी दिली. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने, गुन्हे निरीक्षक गजानन चोरमले, सहायक निरीक्षक भोजलिंग दोडमिसे यांनी घटनास्थळी भेट दिली. इमारतीचे काम सुरू असल्याची माहिती चौकशीत मिळाली. इमारतीतील जिन्यांना कठडे नसल्याचे उघडकीस आले. बांधकाम व्यावसायिकांच्या बेजबाबदारपणामुळे दुर्घटना घडल्याचे उघडकीस आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलिस निरीक्षक भोजलिंग दोडमिसे तपास करत आहेत.

## पुण्यात देवाभाऊंचा रोड शो, स्वागताच्या फटाक्यांनी इमारतीला आग; मोबाईल टॉवर

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराचा धुरळा उडाला असून आज सर्वच राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या जाहीर सभा होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवर्पींळी) यांनी नाशिकच्या गोदावरी काठावर सभा घेतल्यानंतर पुण्यात (झींपश) रोड शोसाठी दाखल झाले आहेत. दुसरीकडे मुंबईत ठाकरे बंधूंची एकत्र जाहीर सभा होत आहे. त्यामुळे, मुंबईसह महाराष्ट्राचे लक्ष मुंबईकडे लागले असतानाचा पुण्यात देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतासाठी उडवण्यात आलेल्या फटाक्यांमुळे आगीची घटना घडली. भोसरीत मुख्यमंत्र्यांचा रोड शो सुरु असताना ही आगीची (ऋळीश) घटना




घडली, येथील एका इमारतीवर रोड- शो दरम्यान फटाके वाजवताना आग लागली होती.

पुण्यातील भोसरीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो सुरु असताना फटाक्यांमुळे एका इमारतीत आग लागल्याची घटना घडली. त्यानंतर, तात्काळ अग्निशमन दलाच्या गाड्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून अग्निशमन दलाच्या जवानांकडून आग आटोक्यात आणण्यात आली. सुदैवाने कुठलीही हानी झाली नसली तरी आगीच्या घटनेत इमारतीवरील मोबाईल टॉवर जळून खाक झाल्याचीही माहिती आहे. या घटनेनं परिसरात गोंधळ उडाला होता, तसेच काही वेळ भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचं दिसून आलं. दरम्यान, आपल्या रोड शो वेळी मुख्यमंत्री पिंपरी चिंचवड पोलिसांवर संतापल्याचं दिसून आलं. पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव नागरिकांना रोखण्यास दोर लावला होता, मात्र मुख्यमंत्र्यांनी पोलिसांकडून लावण्यात आलेला दोऱ्यांचा वेढा काढायला सांगितला.

## सायबर फसवणूक वाढली; महावितरणकडून बारामतीतील वीजग्राहकांना सतर्कतेचे आवाहन

**बारामती । प्रतिनिधी**

डिजिटल युगात ग्राहकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांना जलद व पारदर्शक सेवा मिळते आहे. परिणामी ग्राहकांचा वेळ, श्रम व पैसा वाचतो आहे, तर सायबर भामट्यांकडून सायबर फसवणुकीचे प्रकार वाढलेले आहेत. या पार्श्वभूमीवर खबरदारीची उपाययोजना म्हणून महावितरणच्या बारामती परिमंडलाने सर्व ग्राहकांना सायबर सुरक्षेबाबत सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

सायबर भामट्यांकडून महावितरणच्या नावाचा वापर करून बनावट फोन कॉल, एसएमएस, व्हॉट्सप संदेश किंवा ई-मेलद्वारे ग्राहकांची वैयक्तिक माहिती, ओटीपी, बँक तपशील किंवा यूपीआय माहिती मागून फसवणूक होऊ शकते. काही वेळा 'वीज कनेक्शन तत्काळ तोडले जाईल' अशी धमकी देऊन फसवणूक केली जाऊ शकते. या दृष्टीने महावितरणकडून ग्राहकांना काही सूचना देण्यात आल्या आहेत. महावितरण कधीही ग्राहकांकडून फोनवरून ओटीपी ( जढझ), यूपीआय ( णझख), पिन, डेबिट/क्रेडिट कार्ड तपशील मागत नाही. ग्राहकांनी ऑनलाईन वीजबिल भरण्यासाठी फक्त अधिकृत महावितरण ग्राहक मोबाईल प, वेबसाइट (ु.रहरवळीलो.ळप ) किंवा अधिकृत पेमेंट गेटवेचाच वापर करावा. कुठल्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये किंवा अनोळखी प डाऊनलोड करू नये. सोशल मीडियावरून किंवा व्हॉट्सपवरून आलेल्या बनावट मेसेजेसकडे दुर्लक्ष करावे.

# शारदाबाई पवार महाविद्यालयात करिअर संसद अधिवेशन; आधुनिक कौशल्यांवर भर

**बारामती । प्रतिनिधी**

ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, संचालित शारदाबाई पवार महिला आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शारदानगर, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला होता. या अधिवेशनात व्याख्यानाबरोबर मिलेट प्रोसेसिंग, नर्सरी, हायड्रोपोनिक, व्हेजिटेबल्स,गोट फार्मिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ड्रोन ट्रेनिंग, डेअरी टेक्नॉलॉजी, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, फिशरी फार्मिंग इत्यादी प्रशिक्षणावर भर देण्यात



आला होता.

अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू पराग काळकर यांनी संवाद साधला. ते म्हणाले, करिअर कट्ट्याने विद्यार्थ्यांना एका निश्चित कक्षेत आणून सोडले आहे. इथून पुढे तुम्ही तुमचा आत्मविश्वास जागा करून विकास करा. तुम्हाला तुमच्या भविष्याची दिशा निश्चित मिळेल. तुम्ही २०४७ च्या विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार आहात. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे वेगाने बदल होत आहेत. तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी लागणारी काही कौशल्य तुम्हाला देण्याचा प्रयत्न केला आहे. तुम्ही तुमचे ध्येय निश्चित केले तरच त्याच्या जवळपास पोहोचाल. तुम्ही तुमच्या करिअरचा प्रवास कसा करणार आहे त्याचे मार्ग शोधा. तेथे जाण्यासाठी तुमच्या स्वभावाला अनुरूप असणाऱ्या गोष्टींचा शोध घ्या. तुमच्या मनामध्ये एखादी गोष्ट आली की, ती लगेच करा.

# मोफत कायदेशीर मदत केवळ औपचारिकता नको, ती उच्च दर्जाची असावी; न्या. अतुल चांदूरकर यांचे प्रतिपादन

**पुणे । प्रतिनिधी**

''मोफत कायदेशीर मदतीच्या घटनात्मक अधिकारात उच्च-गुणवत्तेची मदत देण्याची कल्पना आहे. म्हणूनच मोफत कायदेशीर मदत पुरवणारे वकील मेहनती आणि न्याय व्यवस्थेप्रति बांधीलकी असणारे असणे आवश्यक आहे. गरजूंना देण्यात येणाऱ्या मोफत कायदेशीर मदतीचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे,'' असे मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अतुल शरश्चंद्र चांदूरकर यांनी व्यक्त केले.



'आयएलएस विधी महाविद्यालया'मार्फत शनिवारी (ता. १०) आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. साउथ आफ्रिकेमधील सर्वोच्च अपील न्यायालयाचे कार्यवाह न्यायाधीश डॉ. अविनाश गोविंद यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व 'इंडियन लॉ सोसायटी'चे माजी सचिव प्रा. डॉ. सत्यरंजन पुरुषोत्तम साठे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दर वर्षी 'रिमेंबरिंग एस.पी. साठे' हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. कार्यक्रमाचे हे २० वे वर्ष असून यंदा 'क्लिनिकल लीगल एज्युकेशन ण्ड ॲक्सेस टू जस्टीस इन इंडिया : स्ट्रेंग्थनिंग लीगल एड सेन्टर्स थ्रू कम्युनिटी एंगेजमेंट ण्ड लीगल रिफॉर्म' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. 'स्विसएड' संस्थेसोबत संयुक्त पद्धतीने हे चर्चासत्र घेण्यात आले असून त्याला युरोपियन युनियनचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या मोफत कायदेविषयक सल्ला केंद्राने सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेले आहे. प्रा. डॉ. सुवर्णा निलख यांनी 'आयएलएस'च्या कायदेविषयक मोफत सल्ला केंद्राच्या पाच दशकांचा प्रवास आणि कामगिरीची माहिती दिली. महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रभारी डॉ. दीपा पातुरकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सोसायटीच्या सचिव वैजयंती जोशी यांनी प्रा. सत्यरंजन साठे यांचा प्रवास मांडला. स्विससेडच्या भारतातील प्रमुख कविता गांधी यांनी स्विससेडबद्दल माहिती दिली. डॉ. दिव्या मित्तल यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

# निर्यातक्षम केळीसाठी 'सातसुत्री'चा वापर करावा-डॉ. सागर कोपार्डेकर

**नारायणगाव । प्रतिनिधी**

केळीच्या बागेतून जास्तीत जास्त आणि निर्यातक्षम उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांनी सातसुत्री पद्धतीचा अवलंब करावा, असे प्रतिपादन पोलन ग्रो मिनरल्सचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सागर कोपार्डेकर यांनी केले. ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव येथे आयोजित 'ग्लोबल कृषी महोत्सव २०२६' मधील पीक परिसंवादात 'निर्यातक्षम केळी उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. कोपार्डेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, केळीची लागवड ७ बाय ५ फूट अंतरावर गादीवाफ्यांवर करावी. लागवडीसाठी नामांकित कंपनीची उतीसंवर्धित रोपे वापरून ठिबक



सिंचनाचे योग्य नियोजन करावे. तसेच बंच केअरमध्ये इंजेक्शन देणे, स्कर्टिंग बॅग वापरणे, वाळलेली पाने-फुले काढणे यांसारखी कामे वेळेवर पूर्ण करावीत. सध्याच्या कमी तापमानामुळे केळीवर येणाऱ्या 'चिलिंग' समस्येवर उपाय म्हणून लाल शैवालयुक्त औषध, गुळाचे द्रावण आणि चिलेटेड कॅल्शियमची फवारणी करावी, असा सल्लाही त्यांनी दिला. केळी पिकात सातत्य राखल्यास या भागात निर्यातदारांची संख्या वाढून शेतकऱ्यांना अधिक बाजारभाव मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी कृषी विज्ञान केंद्राचे उद्यानविद्या विषयतज्ज्ञ भरत टेमकर यांनी सांगितले की, पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील हवामान केळीसाठी पूरक असून गल्फ आणि सार्क देशांमध्ये येथील केळीला मोठी मागणी आहे. या कार्यक्रमाला कृषिरत्न अनिल मेहेर, विनायक मुळे, ऋजित मेहेर, देविदास भुजबळ, अल्हाद खैरे, निलेश पाटे, देवेंद्र बनकर यांसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाला हायकोर्टाचा दणका! 'त्या' कारवाईवरील स्थगिती उठवली

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या एका कथित मनमानी कारवाईला उच्च न्यायालयाने दणका दिला आहे. शहरातील नामांकित २इक्ध डायनर अँड की क्लबचा मद्यपरवाना निलंबित करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने स्थगित केला आहे. इतकंच नाही तर तात्काळ सील हटवून व्यवसाय सुरू करण्याची परवानगी देखील दिली आहे.


राज्य उत्पादन शुल्क विभागाने गेल्या वर्षी (दि. १५ ऑगस्ट) शहरातील एकूण आठ पबवर नियम आणि वेळेनंतर पब सुरू ठेवून तसेच मद्यविक्री केल्याप्रकरणी कारवाई केली होती. या कारवाईनंतर अ-निमियतेचा ठपका ठेवत दोन दिवसांपूर्वी उत्पादन शुल्क विभागाने २ बीएचके डायनर अँड की क्लबवर कारवाई करत त्यांचा १५ दिवसासाठी परवाना रद्दकरून पबला सील ठोकले होते. दरम्यान मात्र राज्य उत्पादन शुल्क विभागाने इतर त्या आठ पबवर कारवाई केली नव्हती. यामुळे देखील या करवाईबाबत उलटसुलट चर्चा सुरू होती. त्यापबला अभय कोणाचे असाही प्रश्न विचारला जात होता. आता न्यायालयाच्या निकालानंतर मात्र आणखीनच राज्य उत्पादन शुल्क विभागावर प्रश्न चिन्ह उपस्थित झाले आहेत.या कारवाई विरोधात क्लबचे प्रमुख डॉ. हेरंब शेलके यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. न्यायालयात त्यांच्या वतीने ॲड. प्रल्हाद परांजपे यांनी जोरदार युक्तिवाद केला. उत्पादन शुल्क विभागाची कारवाई ही एकतर्फी, अविचारी आणि उच्चहस्तेची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये निळी व लाल पूररेषा नव्याने ठरवणार

**पिंपरी । प्रतिनिधी**

निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात पिंपरी-चिंचवडसह राज्यात नवीन पद्धतीने फेर सर्वेक्षण करण्यात येईल. त्यानुसार पूररेषेची नव्याने आखणी करण्यात येणार असून, फ्लड मेटिगेशन मेजर्सनुसार (पूर निवारण उपाय) कोल्हापूरच्या धर्तीवर नवा डीसीपीआर केला जाईल. सॅटलाईट इमेज, जिओ स्पेशल डेटाच्या माध्यमातून हा प्रश्न कायमचा निकाली काढला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडमधील आकुर्डी येथील सभेत शनिवार (दि. १०) दिले.

पिंपरी-चिंचवड शहरातील भारतीय जनता पार्टी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या अधिकृत उमेदवारांसाठी आकुर्डी विठ्ठल मंदिर येथे शनिवारी (दि १०) मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस



यांच्या उपस्थितीत सभा पार पडली. या वेळी निवडणूक प्रचारप्रमुख आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, उमा खापरे, सदाशिव खाडे, अनुप मोरे व शत्रुघ्न काटे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शहरातील नदीकाठच्या भागात निळ्या आणि लालपूररेषेचा प्रश्न युनिफाईड डीसीपीआरमुळे (एकात्मिक बांधकाम नियमावली) निर्माण झाला. यातील काही तरतुदींमुळे तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे त्या परिसराचा विकास थांबला आहे. निळी आणि लालपूररेषा हे १०० वर्षांपूर्वीच्या गृहितकांवर आधारित आहे. त्या वेळच्या पूररेषेच्या चिन्हांकनानुसार ही रेषा ठरली होती. फडणवीस म्हणाले की, कोल्हापूरमध्ये निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात नव्याने डीसीपीआर करण्यात आला. या आराखड्यानुसार एखाद्या परिस्थितीमध्ये पूरसदृश स्थिती उद्भवल्यास कशा पद्धतीचे बांधकाम असले पाहिजे, त्या पद्धतीने बांधकामे केली आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये ज्या भागात निळी आणि लाल पूररेषासंदर्भात प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यामुळे पूररेषेचा प्रश्न कायमचा निकाली निघेल; तसेच, आगामी काळात मेट्रोचे विस्तारीकरणही मोठ्या प्रमाणात केले जाईल. तिसरी मेट्रो या शहराला देण्यात येईल.